सन १९५७

# ग्रामदान, ग्रामराज्य

आणि

# शांति-सेना

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. १२९३

विनोबा

REFBK-0011504

परंधाम विद्यापीठ

# ग्रामदान, ग्रामराज्य

आणि

# शांति-सेना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८९३९ वि:
क्रमांक नों: दि:

विनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११५०४
REFBK-0011504

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम-सेवा-मंडळ
परंधाम विद्यापीठ, पो. पवनार (वर्धा)

आवृत्ति–१ ली––१००००
विजयादशमी
मूल्य ५० नये पैसे

मुद्रक :
**मोहनलाल भट्ट**
राष्ट्रभाषा प्रेस, वर्धा

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | पहिलें ग्रामदान : मंगरौठ | १ |
| २ | भूदान यज्ञाचें उद्दिष्ट | ४ |
| ३ | क्रांति विचारानें होते | ६ |
| ४ | भूदान-आरोहणाच्या पायऱ्या | ८ |
| ५ | ग्राम-दानाचें मर्म | १० |
| ६ | स्वामित्व-विसर्जनाचा व्यापक अर्थ | ११ |
| ७ | मूल्य परिवर्तन ही च क्रांति | १५ |
| ८ | ग्राम-दान हा नई तालीमचा हि पाया | १७ |
| ९ | ग्राम-दानानें चतुर्विध लाभ | १९ |
| १० | ग्राम-दानानें खरा लाभ कोणता ? | २१ |
| ११अ: | ग्रामदानानें खरी वर्णव्यवस्था आणि आश्रम-व्यवस्था | २३ |
| ११ब: | जातिऐवजीं वृत्ति | २६ |
| १२ | तिरुमंगल तालुक्याचा पवित्र संकल्प | २६ |
| १३ | प्रेम व्यापक करण्याचा कार्यक्रम | ३० |
| १४ | आपल्या कामाचें पथ्य | ३२ |
| १५ | परिग्रह हें चोरीचें मूळ | ३४ |
| १६ | ग्रामदान + ग्रामोद्योग = ग्रामोत्थान | ३७ |

| | | |
|---|---|---|
| १७ | ग्राम-दानांत सगळे च खुष | ३८ |
| १८ | ग्रामदानाची पुढची पायरी तालुकादान | ४२ |
| १९ | मी पूर्णविराम नसून प्रश्नचिह्न आहें | ४७ |
| २० | अकिली ग्रामदानाचें फेरवाटप | ४९ |
| २१ | प्रतिज्ञा | ५२ |
| २२ | ग्रामदानी मंडळींशीं चर्चा | ५४ |
| २३ | ग्रामदान प्रश्नोत्तरी (१) | ५८ |
| २४ | ग्रामदान प्रश्नोत्तरी (२) | ६१ |
| २५ | सेवा-सेना आणि शांति-सेना | ६५ |
| २६ | शांति-सेनेबाबत प्रश्नोत्तरें | ६९ |
| २७ | सर्वोदय मंडळें | ७० |
| २८ | सर्वोदय मंडळांचें कार्य | ७२ |
| २९ | ग्रामराज्यांत सरकारचें स्थान | ७४ |
| | परिशिष्टें | ७७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८७३५ दि. ...
क्रमांक ...
दा. क्र. ९९५०८

# ग्राम-दान, ग्राम-राज्य आणि शांति-सेना

## पहिलें ग्राम-दान : मंगरौठ : १ :

आपल्या जमिनीपैकीं सहावा हिस्सा दरिद्रनारायणाच्या प्रतिनिधीसाठीं म्हणून भूदानांत अर्पण करण्याची गोष्ट विनोबा आपल्या भूदान-पदयात्रेंतून सतत सांगत होते. विनोबांच्या या संदेशामुळें आपल्याजवळ असलेली सर्व जमीन भूदानांत अर्पण करण्याची प्रेरणा हि कांहीं व्यक्तींना झाली. परंतु साऱ्या गांवच्या जमीन-मालकांनीं आपली सर्व जमीन भूदानांत अर्पण केल्याचें उदाहरण घडलें नव्हतें. तो मान मंगरौठ गांवानें पटकावला. गांवाची सगळी जमीन गांवाच्या सामूहिक मालकीची, व्यक्तिगत स्वामित्वाचा पट्टा कोणापाशीं च रहायचा नाहीं आणि गांवांतील जमीन गांवांतील रहिवाश्यांच्या संख्येप्रमाणें समान वाटली जायची, या गोष्टीला ग्राम-दान म्हणायचें.

मंगरौठ हें गांव उत्तर प्रदेशांतील हमीरपुर जिल्ह्यांत आहे. या भागाला बुंदेलखंड म्हणतात. झांशी, जालौन, बांदा, आणि हमीरपुर; या चार जिल्ह्यांचा मिळून बुंदेलखंड बनला आहे. संत तुलसीदासांची भूमि म्हणून बुंदेलखंड प्रसिद्ध आहे त्या च प्रमाणें १८५७ च्या सशस्त्र स्वातंत्र्य-संग्रामाचें केन्द्र म्हणून हि बुंदेलखंड गाजला आहे. भूदान-यज्ञाच्या पर्वांतील ग्रामदानाचें पर्व प्रथम सुरू केल्यामुळें बुंदेलखंड आजच्या युगांत हि पुनः प्रसिद्ध झाला.

संत तुलसीदासजींचें च वचन आहे : "**सबै भूमि गोपाल की वामें अटक कहाँ**" या वचनाची सार्थकता त्यांच्या च भूमींत झाली हा केवढा योगायोग ! मंगरौठ गांवाचे एक प्रमुख कार्यकर्ते,

जमीनदार आणि दिवाणसाहेब म्हणून ओळखले जाणारे दिवाण शत्रुघ्नसिंहजी हे विनोबांच्या उत्तर-प्रदेश-प्रवेशापासून भूदानाच्या कामांत हिरिरीनें लागले होते. मंगरौठचे पुढारीपण त्यांच्या च कडे. ते केवळ त्या गांवाचे जमीनदार नसून कळकळीचे जनसेवक आहेत. त्यांच्याप्रमाणें च त्यांच्या पत्नी 'रानी साहेबा' या देखील अत्यंत साध्या राहणीच्या, त्याग वृत्तीच्या, कष्टाळू आणि प्रेमळ आहेत. त्यामुळें या दोघांबद्दल गांवच्या लोकांना आत्मीयता आणि आदर आहे.

२२ मे १९५२ रोजीं मंगरौठ गांवाजवळ च एका पडावावर विनोबांचा मुक्काम होता. सकाळीं विनोबांच्या पद-यात्रेच्या वाटे-वर मंगरौठची मंडळी विनोबांच्या दर्शनासाठीं त्यांना सामोरी आली. रिक्तहस्तानें भेटीला जायचें नसतें. म्हणून १०१ एकरांचीं दानपत्रें घेऊन मंडळी आली होती. नास्त्यासाठीं वाटेंत विनोबा थांबले तेव्हां मंडळींनीं आपली भेट त्यांना अर्पण केली. परंतु विनोबांना दिवाणसाहेबांच्या गांवाकडून पूर्ण प्रेम हवें होतें. '**नानक पूरा पाया, पूरे के गुण गाय**' हें त्यांचें आवडतें सूत्र आहे. आलेल्या मंडळींना विनोबा म्हणाले "अरे, '**सबै भूमि गोपाल की**' हें दिवाण शत्रुघ्नसिंहजींच्या गांवानें सिद्ध नाहीं करून दाखवायचें तर कोणीं दाखवायचें ?" असें म्हणून विनोबा पुढें निघून गेले. हा प्रसंग वेनवा नदीच्या तीरावरचा.

विनोबांचा हा प्रेरक संदेश घेऊन गांववाले परतले. पण त्यांना चैन पडेना. दिवाणसाहेब त्या दिवशीं गांवांत नव्हते. भूदानासाठीं इतरत्र हिंडत होते. ते रात्रीं परत आले तेव्हां गांवकरी त्यांची वाट पाहत जमलेली त्यांना दिसली. गांवकऱ्यांनीं विनोबांचा

मंत्र त्यांना ऐकविला. दिवाणसाहेबांनीं लगेच आपली सर्व जमीन दान दिल्याची घोषणा केली. गांवच्या लोकांना ही अद्भुत प्रेरणा मिळाली. त्या च रात्रीं सर्वांनीं आपापली जमीन विनोबांना समर्पण केल्याची घोषणा केली.

मंगरौठ गांवांत एकूण १११ कुटुंबें आहेत. पैकीं ४५ भूमिहीनांचीं आणि ६६ भूमिवानांचीं होतीं. एकूण जमीन १३०० एकर होती. परंतु आतां सारे भू-सेवक बनले. १११ कुटुंबांची १३०० एकर जमीन झाली. पुरुष-वर्गापेक्षां स्त्री-वर्गाची भूदानाला तयारी होणें विशेष महत्त्वाचें समजलें पाहिजे. या गांवाच्या बाबतींत राणीसाहेबांनीं घरोघर जाऊन सर्व भगिनी-समाजाला प्रोत्साहन दिलें. "**आधीं केलें मग सांगितलें**" या उदाहरणामुळें राणीसाहेबांचा खूप च प्रभाव पडला. एवढ्या मोठ्या जमीनदाराच्या पत्नीला चिंता वाटली नाहीं मग आपण च कां घाबरायचें ? जें सर्वांचें तें आपलें. या भावनेनें सारा गांव उत्साहानें ग्राम-दानाला तयार झाला. चारी बाजूला एक वातावरण असतांना एखादी गोष्ट जितकी सोपी असते त्यापेक्षां एकट्यानें विचाराच्या निष्ठेच्या जोरावर ती करणें फार कठिण असते. ज्या वेळीं साऱ्या भारतांत एक हि ग्राम-दान झालें नव्हतें त्या वेळीं मंगरौठनें ग्राम-दान केलें असल्यामुळें मंगरौठचा विशेष गौरव आहे.

■ ■ ■

## भू-दान यज्ञाचें उद्दिष्ट : २ :

[ मंगरौठच्या ग्राम-दानानंतर विनोबांच्या लक्षांत आलें कीं सारें गांवचें गांव देखील भू-स्वामित्वाचें विसर्जन करूं शकतें. तेलंगणांत एका रामचंद्र रेड्डीनें भूदान दिल्याबरोबर विनोबांना एक ईश्वरी संकेत मिळाला, आणि एका व्यक्तीला ज्या ईश्वरानें प्रेरणा दिली तो इतरांना कां देणार नाहीं अशी श्रद्धा निर्माण झाली. मंगरौठच्या ग्राम-दानानंतर हि अशी च श्रद्धा विनोबांच्या ठिकाणीं निर्माण झाली. आणि एक गांव जी गोष्ट करूं शकला ती गोष्ट इतर गांवें जरूर करतील आणि ग्रामदानांचा ओघ सुरू होऊं शकेल असें विनोबांना वाटलें. "मंगरौठचे लोक म्हणजे कोणी गंधर्व, किन्नर किंवा देव-लोकांतले नाहींत. ते देखील पृथ्वीवरचे तुमच्या आमच्यासारखे च मानव आहेत" असें विनोबा ठिकठिकाणीं सांगूं लागले. परंतु १९५२ पासून तों १९५५ पर्यंत ग्राम-दानाच्या दृष्टीनें इतरत्र खास प्रगति झाली नाहीं आणि विनोबांनीं हि त्या गोष्टीवर जास्त भर दिला नाहीं. परंतु ओरिसा-मधें गोपबंधु चौधरी आणि त्यांचें सारें कुटुंब ग्राम-दानाच्या दृष्टीनें भूमिका तयार करण्याचें काम करीत होतें. या ओरिसा प्रांतांत विनोबांचा प्रवेश २६ जानेवारी १९५६ रोजीं झाला. आणि विनोबांच्या तेथील पद-यात्रेंत शेंकडों ग्राम-दानांची मालिका सुरू झाली. ओरिसा-प्रवेशाच्या पहिल्या दिवसाच्या भाषणांतून पुढील भाग घेतला आहे. ]

आजच्या शुभ दिवशीं माझा या वीरभूमींत प्रवेश झाला याबद्दल मला आनंद होत आहे. या भूमीनें चक्रवर्ती अशोकाला

अहिंसेची दीक्षा दिली. या भूमीनें चंड अशोकाचें 'धर्म-अशोकां' त रूपांतर केलें.

आजचा दिवस स्वराज्याच्या प्रतिज्ञेचा दिवस आहे. ज्या स्वराज्याची प्रतिज्ञा हिंदुस्थाननें घेतली होती तिचा एक अंश पूर्ण झाला आहे. परंतु तो अंश लहान होता. जो अंश पूर्ण व्हायचा राहिला आहे तो फार मोठा आहे. 'आम्ही कोणाचा जुलूम सहन करणार नाहीं' हा स्वराज्याचा एक अंश आहे तर "आम्ही कोणावर जुलूम करणार नाहीं" हा त्याचा दुसरा अंश आहे.

इंग्रजांची सत्ता येथून गेली असली तरी आपल्यामधें अजून जी अनेक प्रकारची गुलामी आहे ती दूर झाली पाहिजे. स्पृश्य-अस्पृश्य हा भेद अजून आम्हीं सोडला नाहीं. आर्थिक गुलामी तर आहे च. मजूर-मालक हा भेद आहे. फॅक्टरीचे मजूर आणि भूमिहीन मजूर यांचा हि प्रश्न आहे. आमच्या भूदान-आंदोलनाला मीं 'मजूर-चळवळ' च मानलें आहे. त्यांचें दास्य दूर होण्यासाठीं आम्हीं भूदान आणि संपत्तिदान सुरू केलें. परंतु भारतांतून स्वामित्वाचें विसर्जन व्हावें हें शेंवटीं आम्हांला करायचें आहे. परमेश्वर च काय तो मालक, असें व्हावें. आम्हांला संपत्तीची, कारखान्यांची, भूमीची मालकी नाहींशी करायची आहे. आपल्या देशांत "अहिंसक समाजरचना" हा शब्दप्रयोग निघाला याबद्दल मला विशेष आनंद होतो. हिंदुस्थानच्या समाजवादांत आम्हीं गायी-बैलांचा हि अंतर्भाव केला आहे. आदिवासी लोकांना इतरांच्या पातळीवर आणायचें आहे. हीं सगळीं कामें करायचीं आहेत.

आजच्या पवित्र दिवशीं आपण प्रतिज्ञा करूं या कीं आमच्या देशांत आम्ही कोणत्या हि प्रकारची सामाजिक किंवा

आर्थिक गुलामी राहूं देणार नाहीं. संपत्ति आणि जमीन गांवागांवांत वाटली जाईल आणि साऱ्या गांवांचें गो-कुळ बनेल. पहिलें पाऊल म्हणून सहाव्या हिश्श्याची मीं मागणी केली असली तरी शेंवटीं आपल्याला सर्व जमीन गांवाची करायची आहे.

■ ■ ■

## क्रान्ति विचारानें होते : ३ :

[ओरिसामधें पहिलें ग्रामदान मानपूर या गांवचें झालें. नांवाप्रमाणें च या गांवानें या प्रांतांतील पहिल्या ग्राम-दानाचा मान पटकावला. आतांपर्यंत ओरिसांत १०० ग्राम-दानें झालीं होतीं. या घटनेला उद्देशून विनोबा म्हणाले]

ओरिसांतील ज्या गांवांनीं आपलें सर्वस्वदान दिलें त्या गांवच्या लोकांनीं अजून मला पाहिलें देखील नाहीं. आणि तसें पाहण्याची गरज हि नाहीं. सारा समाज देण्याच्या भावनेनें भारला जातो तेव्हां क्रांति होते. मी जमिनीवर चालत असलों आणि जमीन मागत असलों तरी माझी श्रद्धा हवेवर जास्त आहे. ही हवा चारी बाजूला पसरली तर पाहतां पाहतां क्रांति होईल. या बाबतींत गणित उपयोगी पडत नाहीं. हिंदुस्थानांतील बच्चा अन् बच्चा जाणतो कीं सर्वांच्या हृदयांत एक च आत्मा विराजमान आहे. आम्हीं आमच्या डोक्यावर स्वामित्वाचा भार लादून घेतला असल्यामुळें साऱ्या चिंता, क्लेश, झगडे, आणि कटकटी निर्माण झाल्या आहेत. तें स्वामित्व खालीं पटकून दिलें तर परमेश्वराचीं लेकरें बनूं आणि त्यानें दिलेला चारा पक्षांप्रमाणें खाऊं.

सर्वोदय-विचाराची खुबी ही आहे कीं तो विचार ज्याला पटला तो एकटा मनुष्य देखील त्या विचाराप्रमाणें अंमल

करूं शकतो. एकटा मनुष्य देखील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं साऱ्या जगाविरुद्ध उभा राहूं शकतो. "समोरच्यानें शस्त्र खालीं ठेवलें तर मी ठेवीन" या विचारामुळें जो तो शस्त्र वाढवीत आहे. हें दुष्टचक्र तोडायचें असेल तर एखाद्या राष्ट्रानें, गांवानें किंवा व्यक्तीनें हिंमत करून पुढें आलें पाहिजे.

जगांतील प्रत्येक व्यक्ति प्रत्येक देशाची नागरिक आहे, हा भारताचा विचार आहे. म्हणून भूदानाचा आमचा हा विचार आंतर्राष्ट्रीय क्षेत्रांत पसरूं शकेल. या विचाराचें नेतृत्व आमच्या येथील खेडीं करतील. म्हणून मी म्हणत असतों कीं मानपूरचें आक्रमण ऑस्ट्रेलियावर होणार आहे.

प्रत्येक गांव गोकुळ बनावें, गांवांतील सर्वांनीं एका कुटुंबाप्रमाणें मिळून मिसळून रहावें, गांवची सारी जमीन सर्वांची बनावी, आणि सर्वांनीं वाटून खावें, असा आहे आमचा ग्रामदानाचा विचार.

आज गांवांत दूधदुभतें तयार होतें पण गांवच्या मुलांच्या पोटांत तें जात नाहीं. कारण शहरांत दूध, लोणी विकून पैसा करायची संवय गांववाल्यांना लागली आहे. पैसा कां लागतो? वस्त्र इत्यादि नित्याच्या वस्तु आपण गांवांत बनवीत नाहीं म्हणून. गांवचे लोक कापूस पिकवतात, पण तो विकतात आणि शहरांतील गिरण्यांतून तयार झालेलें कापड विकत घेतात. तीळ पिकवतात, पण तो विकून मिलचें तेल विकत घेतात. ऊंस पिकवतात, पण तो विकून साखर खरेदी करतात. वास्तविक कापड, तेल, गूळ इत्यादि वस्तु खेड्यांत बनविल्या पाहिजेत. असें झालें तर मग दूध, लोणी विकायची जरूर पडणार नाहीं.

■ ■ ■

## भूदान-आरोहणाच्या पांच पायऱ्या : ४ :

ओरिसांत ग्राम-दानाचें व्यापक दर्शन झालें तेव्हां विनोबांना भूदान-आरोहणांतील भू-क्रांतीचें च जणूं दर्शन झालें. याबाबत आतांपर्यंतच्या आंदोलनाचा आढावा घेतांना विनोबा म्हणाले.

"येथें जें काम होत आहे त्यांत क्रांतीचें दर्शन होतें. सारा गांव एका परिवाराप्रमाणें बनूं लागला तर त्याला काय नांव द्यायचें या बाबतींत अर्थशास्त्र-विशारदांमधें भले विवाद होवो, परंतु 'गांवचें एक कुटुंब बनवा' असें जेव्हां मी सांगतों तेव्हां आमच्या खेडयांतील जनतेला ती गोष्ट एकदम पटते. कारण भारतामधें परिवारभावना दृढमूल आहे. ग्राम-राज्याचें जें काय संयोजन आपल्याला करायचें आहे त्याचा पाया ग्राम-दानांत आहे. म्हणून ग्राम-दान ही भूदान-यज्ञाची अंतिम भूमिका आहे असें मीं म्हटलें आहे.

ग्राम-दान झालें कीं काम संपलें असें नसून उलट त्यानंतर च कामाची खरी सुरवात व्हायची आहे. आम्हीं आतांपर्यंत अनेक विधायक कामें केलीं आणि ग्रामीण जनतेला कांहीं मदत पोंचविली. परंतु अहिंसक जनशक्ति देशांत कशी निर्माण करतां येईल याबाबत अनेक वर्षांपासून चिंतन चालूं होतें. गेलीं ३० वर्षें ग्रामसेवेच्या कार्यांत च माझीं गेलीं. आज भूदान-यज्ञाच्या एका पाठोपाठ एक ज्या पांच पायऱ्या चढायची संधि आपल्याला मिळाली त्याचें श्रेय आमच्या गेल्या तीस वर्षांच्या ग्रामसेवेला आहे. म्हणून आमचें उद्दिष्ट पुरें होत आहे असें दिसल्यावर माझा येथील मुक्काम मीं वाढविला. हिंदुस्थानच्या एकूण जमिनीचा सहावा हिस्सा म्हणून पांच कोटी एकरांची मीं मागणी केली. ती मागणी पुरी झाली

असती तरी अहिंसक जनशक्ति निर्माण करण्याचें काम अपुरें च राहिलें असतें. येथें होत असलेलें ग्राम-दानाचें काम जर झालें नसतें तर पांच कोटी एकर जमीन मिळून हि जनशक्ति निर्माण करण्यासाठीं दुसरें एखादें साधन आम्हांला शोधावें लागलें असतें. पांच कोटी एकर जमीन मिळावी ही माझी मागणी कायम च आहे. त्यानें काम व्यापक होईल. परंतु ग्रामदानानें जें काम होत आहे तें खोल होत आहे. कोरापुट साऱ्या भारताला मार्गदर्शक बनेल अशी मला आशा आहे.

भूदान-यज्ञाची पहिली पायरी दुःख-निवारणाची होती. तिला मीं '**अशांति-शमन**' नांव दिलें आहे.

दुसरी पायरी साऱ्या देशाचें लक्ष भू-समस्येकडे खेचून घेणें ही होती. तिला मीं '**ध्यानाकर्षण**' नांव दिलें आहे.

तिसरी पायरी कार्यकर्त्यांतील निष्ठा दृढ करण्याची होती. म्हणून तिला मीं '**निष्ठा-निर्माण**' असें नांव दिलें आहे.

चौथी पायरी एखाद्या प्रदेशांत सहाव्या हिश्श्याचें काम कसें पुरें करतां येईल तें पाहण्याची होती. तिला मीं '**व्यापक भूमि-दान**' नांव दिलें आहे.

पांचवी पायरी गांवाचें एक कुटुंब बनविण्याची आहे. या पायरीनंतर ग्राम-राज्य आणि राम-राज्य यांचा आरंभ व्हायचा आहे. म्हणून हिला मीं '**भूमि-क्रांति**' असें नांव दिलें आहे."

■ ■ ■

## ग्राम-दानाचें मर्म : ५ :

आज आमच्या पद-यात्रेला सहा वर्षें पूर्ण झालीं. सहा वर्षें एका च विषयावर बोलत आलों. शब्दाची शक्ति मर्यादित असते. खरें काम हृदय-प्रवेशानें होतें. त्यासाठीं प्रत्यक्ष सेवा हें एक बलवान् साधन आहे. मानसिक चिंतन हें हि बलवान् साधन आहे. परंतु भगवंताची प्रार्थना हें सर्वांत मोठें साधन आहे. सर्व साधनांचा विनियोग केला म्हणजे यश लाभतें.

पुष्कळांची अशी समजूत झाली आहे कीं भूदान म्हणजे फक्त जमीनवाल्यांनीं जमीन द्यायची. संपत्ति-दान म्हणजे फक्त संपत्ति-वाल्यांनीं संपत्ति द्यायची. परंतु माझी कल्पना अगदीं वेगळी आहे. या आंदोलनामधें प्रत्येकानें कांहीं ना कांहीं द्यायचें च आहे. ज्यांना आपण मजूर समजतों त्यांच्याजवळ हि देण्यासारखी वस्तु आहे. हीं मुलें बसलीं आहेत त्यांच्यापाशीं देखील देण्यालायक कांहीं आहे च. देण्यासारखी कांहीं वस्तु च नाहीं असा एक हि अभागी माणूस जगांत देवानें निर्माण केला नाहीं. मजुरांजवळ श्रम-शक्ति आहे, प्रेम-शक्ति आहे. देवानें गरिबांच्या हृदयांत जास्त प्रेम ठेवलेलें असतें. हा अनुभव सर्वांना येतो. श्रीमंतांच्या महालापेक्षां गरिबाच्या झोंपडींत जास्त प्रेम आढळतें. हे गरीब लोक दया-पात्र कसें म्हणतां येतील ? दया-पात्र तर ते आहेत कीं जे स्वतःजवळ राखून ठेवतात, देणें ही वस्तु जाणत नाहींत.

देण्याची क्रिया आज चालू च आहे. परंतु ती फक्त कुटुंबा-पुरती मर्यादित आहे. कुटुंबांत आनंदाचें दर्शन होतें त्याचें मर्म देण्यांत, त्यागांत आहे. प्रेमपूर्वक त्याग केला जातो तिथें आनंदाची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२८९३५ वि: निबंध
क्रमांक ७२५३ नों: दि: 15.12.67



अनुभूति येते. ही त्यागाची प्रक्रिया व्यापक करून साऱ्या गांवाला लागू करणें ही या आंदोलनाची खरी भूमिका आहे.

गरिबांनीं देखील कांहीं ना कांहीं गांवाला द्यायचें आहे. असें न झालें तर त्यांची इभ्रत राहणार नाहीं. गरिबाच्या मुलाला हि वाटलें पाहिजे कीं आम्ही गांवाला कांहीं देतों. श्रमवान् श्रम देईल, बदल्यांत जमीन मिळवील. भूमिवान् भूमि देईल, बदल्यांत श्रम मिळवील. दोघे हि देतील आणि दोघे हि मिळवितील. आजारी मनुष्य श्रम हि देऊं शकणार नाहीं. परंतु रोगाबद्दलचें ज्ञान तो देऊं शकतो; भेटायला येणारांकडे प्रेमाच्या नजरेनें पाहूं शकतो. अशा रीतीनें प्रत्येकानें कांहीं ना कांहीं द्यावें, सर्वांचें हृदय व्यापक बनावें, सहकाराची भावना वाढावी सामुहिक जबाबदारीचें भान व्हावें, हा या आंदोलनामागील मुख्य विचार आहे. जमीन प्रत्येकाची अलग असूं शकेल, घर अलग असूं शकेल, रसोई अलग असूं शकेल परंतु सर्वांचें हृदय एक असलें पाहिजे. प्रत्येक जण दुसऱ्याची चिंता करतो आहे असें झालें पाहिजे. याचें नांव ग्राम-दान.

■ ■ ■

## स्वामित्व-विसर्जनाचा व्यापक अर्थ : ६ :

आज सकाळीं कांहीं कार्यकर्ते भेटायला आले होते. त्यांनीं एक मोठा मजेदार प्रश्न विचारला. ते म्हणाले "ग्राम-दानांत गांवची जमीन सर्वांच्या मालकीची होईल आणि गांवांतील सर्व लोक सुखी होतील हें खरें. परंतु समजा कीं एका गांवांत जमीन जास्त आणि लोकसंख्या कमी आहे, आणि दुसऱ्या गांवांत जमीन कमी आणि लोकसंख्या जास्त आहे. दोन्ही गांवांचें ग्राम-दान झालें आहे असें समजा. परंतु दुसऱ्या गांवापेक्षां पहिलें गांव ग्राम-दान

होऊन हि अधिक सुखी होणार नाहीं का ?" मीं म्हटलें, "ग्राम-दानाची पुढली पायरी ही असेल कीं ज्या गांवांत माणसें कमी आणि जमीन जास्त असेल त्या गांवचे लोक शेजारच्या गांवच्या लोकांना आपल्या गावांत राहण्यास यायला आमंत्रण देतील. परंतु एकदम च सर्व प्रश्न आपण हातीं घेऊं पाहूं तर तें जमणार नाहीं. आधीं एकेका गावांचें ग्राम-दान होऊं द्या. मग पुढचा विचार हि लोकांना पटवितां येईल."

भूदान-यज्ञाचा खरा उद्देश काय हें नीट समजून घ्या. भूदान एखाद्या गांवापुरतें मर्यादित राहणार नाहीं. इतकें च काय पण तें एका देशापुरतें हि मर्यादित राहणार नाहीं. आज जरी हिंदुस्थान-पुरतें भूदान आम्हीं सुरु केलें असलें तरी माझ्या मनांत मीं ओळखलें आहे कीं हा जगाचा च प्रश्न मीं हातीं घेतला आहे. साऱ्या दुनियेचा प्रश्न एकदम हातीं घेणें शक्य नाहीं आणि तसा घेऊं पाहणें अहंकार हि ठरेल. म्हणून सध्यां भारतापुरता च आपण विचार करूं या.

एका गांवांत कमी जमीन तर दुसऱ्या गांवांत जास्त जमीन हें जसें असतें तसें अेका जिल्ह्यांत, प्रांतांत, किंवा देशांत, कमी जमीन आणि दुसऱ्या जिल्ह्यांत, प्रांतांत किंवा देशांत, जास्त जमीन असें हि असूं शकतें. म्हणून मी म्हणत असतों कीं जमिनीवर एखाद्या व्यक्तीची, गांवाची, किंवा देशाची हि मालकी नसून सर्व मालकी परमेश्वराची आहे.

एकदां एका व्याख्यानांत मीं म्हटलें होतें कीं ऑस्ट्रेलियांतील जमिनीची मागणी करण्याचा जपानच्या लोकांना हक्क आहे आणि जपानी लोकांना आपल्या येथें येऊं देणें ऑस्ट्रेलियाच्या लोकांचें

कर्तव्य आहे. ऑस्ट्रेलियाची हवा गरम आहे. म्हणून तिथें जे इंग्लंडमधले लोक वस्ती करून राहिले आहेत ते समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्यानें राहिले आहेत आंतल्या भागांत ते जाऊं च शकत नाहींत. पन्नास शंभर मैलांचा किनाऱ्याचा भाग च फक्त त्यांनीं व्यापला आहे. आंतल्या भागांत वस्ती करायची म्हटली तर आजच्या पांचपट वस्तीला तेथें अवकाश आहे. परंतु आस्ट्रेलियाचे लोक दुसऱ्यांना तिथें येऊं देत नाहींत. ते म्हणतात 'आमची सभ्यता आणि संस्कृति बिघडेल.' परंतु हा संकुचित विचार आहे.

मी जेव्हां म्हणतों कीं "भूदानयज्ञ साऱ्या जगांतील स्वामित्वाचें विसर्जन करूं पाहतो" तेव्हां कांहीं लोक म्हणतात, "बाबा बोलतो तर खूप मोठ्या गोष्टी ! एकीकडे पायी फिरतो आहे आणि भाषा बोलतो जगांतली मालकी नष्ट करण्याची." परंतु असें म्हणण्यांत अज्ञान आहे.

हवा ज्याप्रमाणें सर्वत्र संचार करते त्याप्रमाणें च विचारांचे प्रवाह हि संचार करीत असतात. सद्विचाराच्या प्रचारासाठीं रेल्वे नको, टेलीफोन नको, वीज नको, कीं रेडियो नको. विचार-प्रचारासाठीं 'ब्रॉड' कास्टची जरूर नसून 'डीप' कास्टची, म्हणजे प्रत्यक्ष आचरणाची, जरूर असते. आचरणांत विचार अुतरला कीं तो जीवनांत खोल उतरतो. मग त्याचा हवेंत प्रचार करण्याचें काम तर हे पक्षी हि करतात.

म्हणून बाबा जेव्हां म्हणतो कीं 'साऱ्या जगांतली मालकी नष्ट झाली पाहिजे' तेव्हां हें एक आकाशपुष्प आहे असें समजूं नका. हें काम तुमच्या आमच्या सारखीं माणसें देखील करूं शकतील. परंतु त्यासाठीं आंतून तशी निष्ठा उत्पन्न झाली पाहिजे.

दुसरे कोणी विचारतात. "मालकी ही वस्तु तर अनादि काळापासून चालत आली आहे. ती नष्ट व्हावी असें आतांपर्यंत कोणीं च म्हटलें नाहीं. इतिहासांत जें घडलें नाहीं तें तुम्ही करूं पाहत आहांत. तें कसें जमावें ? "मी म्हणतों कीं जी गोष्ट इतिहासांत घडली नाहीं ती घडविण्यासाठीं च तुमचा आमचा जन्म आहे. देवानें आम्हांला जन्माला घातलें तर आमच्यासाठीं कांहीं कार्य देऊन च घातलें असलें पाहिजे हें ओळखलें पाहिजे. तसें नसेल तर आमचा जन्म फक्त पूर्वजांच्या पराक्रमांचीं गीतें गाण्यासाठीं आहे का ? जुन्या पराक्रमांत भर घालून कळस चढवायचें काम आपल्याला करायचें आहे.

आम्ही साऱ्या जगांत शांति नांदावी असें इच्छितों. त्यासाठीं मालकी हक्क नष्ट झाले पाहिजेत असें आमचें म्हणणें आहे. भूदानयज्ञांत दिलें गेलेलें प्रत्येक दानपत्र म्हणजे विश्वशांतीला मिळालेलें मत होय असें मीं म्हटलें आहे. तामिलनाडमधें हि ग्राम-दान होत आहे. ही काय कमी क्रांति आहे ? लोक आपण होऊन मालकी सोडत आहेत. यांना समजावून सांगायला तरी कोणते विद्वान् लोक जात आहेत ? आमचीं माकडें विचार समजावण्यास जातात आणि लोकांना विचार पटतो. हा केवळ आमचा महिमा नाहीं. हा काळाचा, युगाचा, महिमा आहे. काळाच्या हातांतलें आम्ही फक्त अवजार आहोंत.

म्हणून बंधूंनो, श्रद्धेचें बळ घेऊन उठा, आणि सारी मालकीची भावना पटकून द्या. तसें कराल तर तुम्ही उंच उठाल आणि तुमच्या जयजयकारानें सारें जग भरून जाईल.

■ ■ ■

## मूल्य-परिवर्तन ही च क्रांति : ७ :

[ ओरिसांत ग्रामदानें मिळूं लागलीं तरी कांहीं लोक म्हणूं लागले कीं " ग्रामराज्याचा तुमचा नमुना जोंपर्यंत गांवांत दिसत नाहीं तोंपर्यंत अहिंसक क्रांति पूर्ण झाली असें म्हणतां येत नाहीं." या म्हणण्यांत क्रांतीबद्दलच्या कल्पनेचें अज्ञान कसें आहे तें विशद करून सांगतांना विनोबा म्हणाले. ]

" या प्रदेशांत पुष्कळ ग्रामदानें मिळत आहेत. त्यामुळें आमची कसोटी होणार आहे हें खरें असलें तरी मला पाहिजे असलेली मुख्य वस्तु कोणती तें मी सांगूं इच्छितों. जगाचा कारभार चालविण्याची जबाबदारी माझी आहे असें मीं कधीं च मानलें नाहीं. जगाचा व्यवहार जग चालवीत बसेल. माझें काम विचाराचा प्रचार करणें हें आहे. आत्मा सर्वव्यापी आहे, व्यक्तिगत मालकीची भावना चुकीची आहे, हा विचार गांवोगांव पसरविणें हें माझें काम आहे. हा विचार समजून जर गांवांनीं ग्रामदान केलें असेल तर त्या वस्तूचें क्रांतीच्या दृष्टीनें स्वतंत्र मूल्य आहे. ग्रामदानानंतर गांवांतील रचना बरी होते कीं वाईट होते याचा त्या मूल्याशीं मुळीं च संबंध नाहीं. मी उदाहरण देतों. आम्हीं पुष्कळ प्रयत्नानंतर हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविलें. हें स्वराज्य आम्ही कसें राबवितों आणि आमची उन्नति किती लवकर करून घेतों यावर आमच्या स्वराज्याची कसोटी लागणार आहे हें खरें असलें तरी समजा कीं आम्ही तशी उन्नति लवकर साधूं शकलों नाहीं, तर त्याचा अर्थ इतका च होईल कीं आमची बुद्धिशक्ति आणि लायकी कम दर्जाची आहे. परंतु आम्हीं जें स्वातंत्र्य मिळविलें त्याचें मूल्य स्वतंत्र च आहे. स्वराज्यानंतरच्या रचनेशीं

स्वातंत्र्य-प्राप्तीच्या मूल्याची सांगड घालतां येत नाहीं. त्याप्रमाणें ग्रामदानाच्या घटनेचें स्वतंत्र मूल्य आहे. ग्राम-रचनेशीं त्याची सांगड घालणें बरोबर नाहीं.

लोक आतांपर्यंत फंड जमा करीत होते. परंतु दरिद्र-नारायणाला आपल्या कुटुंबांतील एक व्यक्ति समजून त्याला एक हिस्सा देणें हें मूल्य-परिवर्तन झाल्याचें लक्षण आहे. म्हणून निधि जमविणें आणि संपत्तिदान मिळविणें यांत महदंतर आहे. या संपत्तिदानाचा विनियोग कसा करायचा हें अकलेचें काम आहे. परंतु लोकांनीं आपल्या उत्पन्नाचा हिस्सा समाजाला अर्पण करण्यांत मूल्यपरिवर्तन आहे.

असें मूल्यपरिवर्तन जेव्हां होतें तेव्हां च ती "शांतिमय क्रांति" म्हणायची. क्रांतीच्या मागें 'शांतिमय' हें विशेषण हि मीं उगीच च लावलें. कारण खरी क्रांति कधीं च अशांतिमय नसतें. कसें तरी करून बदल घडवून आणणें याला क्रांति म्हणत नाहींत. मूल्य बदलण्याला च क्रांति म्हणतात. आणि मूल्यें कधीं जोर जबरदस्तीनें बदलत नसतात. विचार पटवून च मूल्यपरिवर्तन होत असतें.

यावर लोक म्हणतात "तुमच्या या विचार-परिवर्तनानें होणाऱ्या क्रांतीला किती तरी काळ लागेल." मी म्हणतों काळ किती लागेल याची मला तितकीशी चिंता नाहीं. "विचार-क्रांति शीघ्र होत असेल तर ठीक, नाहीं तर शीघ्र अविचार-क्रांति केली पाहिजे," हा विचार मला मान्य नाहीं. असला 'शीघ्रवाद' म्हणजे क्रांति नव्हे. उपाशी माणसाला लवकरांत लवकर भाकरी मिळाली पाहिजे हें खरें असलें तरी "भाकरी लवकर मिळत

नाहीं तर विष द्या, पण लवकर द्या" असला शीघ्र-भोजन-वाद शहाणपणाचा म्हणतां येणार नाहीं. क्रांति म्हटली कीं "रक्तलांछित" असें लोकांच्या मनांत असतें. म्हणून मीं 'शांतिमय' हें विशेषण जोडलें. वास्तविक त्या विशेषणाची गरज नाहीं.

■ ■ ■

## ग्राम-दान हा नई तालीमचा हि पाया : ८ :

आज शिक्षणाचें स्वरूप कसें आहे ? कांहीं लोक मेहनत करणारे आहेत त्यांना विद्या मिळत नाहीं. कांहीं लोक विद्वान बनले आहेत त्यांच्या हातांत उद्योग नाहीं. असे समाजांत दोन वर्ग पडल्यामुळें ठिकठिकाणीं आपल्याला झगडे, ईर्षा, द्वेष, दिसून येतो. कांहीं जातींना अधिक विद्या मिळाली, कांहीं जाती मागे पडल्या. त्यामुळें मग जातिद्वेष सुरू झाला.

याला उपाय हा च कीं जीवनाची योजना बदलली पाहिजे. परमेश्वरानें प्रत्येकाला दोन हात दिले आहेत, भूक दिली आहे, आणि बुद्धि दिली आहे. कांहीं लोकांनीं फक्त मेहनत करावी आणि कांहीं लोकांनीं फक्त दुसऱ्याच्या मेहनतीचें फळ खावें, ही समाजरचना सदोष आहे.

कुरलमधें पहिल्या अध्यायांत म्हटलें आहे कीं विद्या प्राप्त करा, परंतु परमेश्वरासमोर मस्तक नमलें नाहीं तर ती विद्या काय कामाची ? खरी विद्या म्हणजे नम्रता, विनय. संस्कृतांत विनय म्हणजे च शिक्षण असा अर्थ होतो. गीता म्हणते "विद्या-विनय-संपन्न द्विज" अशा रीतीनें विद्येबरोबर भक्ति आणि नम्रता पाहिजे असें कुरलचा पहिला अध्याय सांगतो.

कुरलच्या दुसऱ्या अध्यायांत पावसाचा महिमा गाइला आहे. पाऊस सुरू झाला म्हणजे शेतकऱ्याला शेतांत काम करावें लागतें. हें झालें तप. शेतांत पिकलेलें धान्य सर्वांना वाटून द्या असें हि या अध्यायांत म्हटलें आहे. हें झालें दान. अशा रीतीनें तप आणि दान या गोष्टी दुसऱ्या अध्यायांत सांगितल्या.

हे दोन्ही अध्याय मिळून नई तालीम होते. ग्राम-दान हें नई तालीमचें उत्तम उदाहरण आहे. तुम्ही विचाराल, "ग्राम-दानाचा नई तालीमशीं काय संबंध ?" परंतु तमिळ भाषेंत नई तालीमला "आधार कल्वी", म्हणजे जीवनाचा आधार, म्हणतात. परंतु ग्राम-दान हा जीवनाधाराचा हि आधार आहे. कारण ग्राम-दान झालें तर च एकूण एक मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था होऊं शकेल. केवळ सक्तीचें शिक्षण करून हें साधणार नाहीं. कारण गरिबांच्या मुलांना आपल्या आई-बापांच्या कामांत मदत करायला जावें लागतें. मग त्यांनीं शाळेंत कसें यायचें ? ग्राम-दान झालें म्हणजे कोणी गरीब राहणार नाहीं, कोणी श्रीमंत राहणार नाहीं, आणि सर्वांच्या मुलांची सारखी सोय होईल. म्हणून मी ग्राम-दान हा नई तालीमचा हि पाया आहे असें म्हणतों.

आज शेतकरी शेतांत काम करतो तें लाचारीनें करतो. कुरलमधें शेतीच्या कामाला जी प्रतिष्ठा मानली आहे ती आज समाजांत दिसत नाहीं. मजुराच्या मनांत श्रमाची प्रतिष्ठा नाहीं आणि शिक्षितांच्या हि मनांत ती नाहीं. शिवाय श्रमाच्या कामाला पैसा कमी दिला जात असल्यामुळें त्याला आर्थिक मूल्य देखील नाहीं. अशा रीतीनें श्रमाला आज आर्थिक, सामाजिक, आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा उरलेली नाहीं. ही स्थिति जोंपर्यंत चालू राहील तोंपर्यंत देशाची उन्नति होण्याची आशा नाहीं.

■ ■ ■

## ग्राम-दानानें चतुर्विध लाभ : ९ :

[ग्राम-दान म्हणजे गांवचें एक कुटुंब. हें झालें म्हणजे आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक, आणि आध्यात्मिक लाभ कसा होतो हें समजावून सांगतांना विनोबा म्हणाले.]

जमिनीची व्यक्तिगत मालकी सोडून साऱ्या गांवची जमीन गांवाच्या मालकीची केल्यानें पहिला लाभ हा होईल कीं गांवचें अन्नाचें उत्पन्न वाढेल. कोणत्या शेतांत काय पेरावें, किती पेरावें, वगैरे बाबतींत साऱ्या गांवचे लोक मिळून विचार करतील. गांवांत उत्पन्न झालेल्या धान्यापैकीं किती बाहेर विकावें हें हि गांवचे लोक मिळून ठरवतील. बाहेरून सरकारी किंवा अन्य प्रकारची मदत मिळायची झाली तर साऱ्या गांवाला मिळून मदत दिली जाईल. कर्ज देखील व्यक्तिगत राहणार नाहीं. अशा रीतीनें काय काय लाभ होतील याची गणती च करायला गेलों तर एक मोठा ग्रंथ, होईल. थोडक्यांत सांगायचें तर समग्र ग्राम-दानानें गांवाला आर्थिक स्वातंत्र्य लाभेल.

साऱ्या गांवाचें एक कुटुंब बनविल्यानें दुसरा लाभ हा होईल कीं गांवांतील मंडळींचें परस्परांबद्दलचें प्रेम आणि आनंद वाढेल. दुसऱ्याच्या दुःखांत आपण भाग घेतला म्हणजे दुःख कमी होतें. आणि सुखांत भाग घेतला म्हणजे सुख वाढतें. मनुष्य स्वतःला विसरला म्हणजे त्याची आनंद-वृद्धि होत असते. कुटुंबांत प्रत्येक-जण आपला वेगळेपणा न ठेवतां सारें कुटुंब आपलें मानतो म्हणून कुटुंबांत आनंद नांदतो. एकटयाला खेळण्यांत मजा वाटत नाहीं. सारे मिळून खेळूं लागले कीं आनंद वाढतो. म्हणून गांवाचें एक कुटुंब केलें कीं जीवनांत आनंद वाढेल, रुचि वाढेल, स्वाद वाढेल. याला मी सांस्कृतिक लाभ म्हणतों.

एक परिवार बनविण्यानें तिसरा लाभ हा होईल कीं लोकांची नीतिमत्ता वाढेल. भांडणें, शिव्यागाळी, चोरी वगैरे प्रकार कमी होतील. घरांत कुणीं कांहीं वस्तु घेतली तर तिला चोरी म्हणत नाहींत. मुलानें न विचारतां वस्तु घेतली तर आई इतकें च म्हणेल कीं विचारून घ्यावें. पण 'चोरी केलीस' असें म्हणणार नाहीं. अशा रीतीनें गांवांतून चोरी ही वस्तु नाहींशी होईल. आज परस्पर स्वार्थामुळें ईर्षा, द्वेष, झगडे होत असतात. त्यामुळें जगांत दुःख आणि हिंसा वाढली आहे. गांवची सारी संपत्ति आणि जमीन गांवाच्या मालकीची केली कीं नैतिक उत्थानाचा मार्ग मोकळा होतो.

आणि या सर्व लाभांहून मोठा लाभ हा होईल कीं मनुष्याचें ममत्व सुटेल. ही बाब जगाच्या इतर देशांतील लोक समजोत वा न समजोत परंतु हिंदुस्थानच्या खेडयांतील जनता मात्र या गोष्टीचें महत्त्व जरूर ओळखील. पुष्कळांना वाटतें कीं घरदार सोडलें म्हणजे ममत्व सुटतें. परंतु तें खरें नाहीं. अशा रीतीनें घरापासून पळून गेल्यानें च मुक्ति लाभते असें नाहीं. ममत्व सुटण्याची युक्ति ही आहे कीं आपण आपलें कुटुंब संकुचित न करतां व्यापक करावें. "मी कोणाचा नाहीं आणि कोणी माझा नाहीं" ही वृत्ति राखून मनुष्य मुक्त होत नाहीं. "मी सर्वांचा आहे आणि सगळे माझे आहेत" या वृत्तीनें मनुष्य मुक्त होतो. समाजाचा आणि घरा-दाराचा त्याग केला तरी शेंवटीं लंगोटींत च आसक्ति अडकून राहते असा हि अनुभव येतो. म्हणून आसक्ति सुटण्यासाठीं "मी सर्वांचा आणि सगळे माझे" ही च वृत्ति हवी. ग्राम-दानांत ही वृत्ति वाढते हा ग्राम-दानाचा फार च मोठा लाभ आहे.

■ ■ ■

99408
ग्रा. क्र.

## ग्राम-दानानें खरा लाभ कोणता ? : १० :

ग्राम-दानाचा सर्वांत मोठा लाभ हा कीं त्यानें एक समाज बनेल. समजा कीं ४० घरांचें गांव आहे. त्यांत फक्त १० घरवाल्यां-जवळ जमीन आहे आणि बाकीचे सारे शेत-मजूर आहेत. सर्वांसाठीं या गांवची जमीन अर्थात च पुरेशी असणार नाहीं. आतां दहा घरवाल्यांनीं आपली सर्व जमीन गांवाला दिली तरी तेवढयानें गांव कसा सुखी होणार ? कोणती समृद्धि वाढणार ? परंतु असा विचार करणें च चूक आहे. जें काय खायला मिळेल तें सर्वांना सारखें मिळेल, उपवास करावा लागला तरी सर्वांना करावा लागेल, यांत च मानवता आहे. रामनवमी, महाशिवरात्र, एका-दशी, यांसारख्या पवित्र दिवशीं घरीं अन्न असून आपण उपवास करतों. यांत भक्ति आहे असें आपण समजतों. परंतु गांवासाठीं किंवा समाजासाठीं फाका करण्यांत एकादशीपेक्षां जास्त भक्ति आहे, असें माझें म्हणणें आहे. आपल्याजवळ असलेलें आपण सर्व गांवाला दिल्यानंतर जें काय सर्वांना मिळून वाटून खातां येईल तें खायचें, ही भावना वाढली पाहिजे. आणि एखाद्या दिवशीं सबंध गांवाला च फाका करण्याची पाळी आली तर तें परमभाग्य समजावें. ती च आपली महाशिवरात्र ! मग सबंध गांव मिळून उत्पादन वाढविण्याची चिंता करील.

गांव एक झाल्यानंतर बाहेरचे लोक गांवाला मदत देऊं लागतात हें खरें आहे. परंतु ती मदत गौण वस्तु आहे. मुख्य लाभ हा कीं आजपर्यंत मूठभर लोक पोटभर खात होते आणि बाकीचे फाका करीत होते. आतां खातील तर सारे खातील, फाका करायची पाळी आली तर सारे फाका करतील. लग्नापूर्वीं एकटा

असतांना मनुष्य जें काय खात पीत होता तें लग्न झाल्यानंतर मुलें बाळें वगैरे संसार वाढल्यावर खाऊं शकत नाहीं. मग लग्नाचा लाभ काय? लग्नानंतर कुटुंब मोठें होतें आणि स्वतःशिवाय इतरांची चिंता करण्याची संवय लागते. म्हणजे 'स्व' मोठा झाला हा च खरा लाभ.

लग्न केल्यानंतर खायला प्यायला जास्त च मिळेल असें जसें सांगतां येत नाहीं तसें ग्राम-दान झाल्यानंतर खायला प्यायला जास्त मिळेल असें समजूं नका. ग्राम-दानांत जमीन दिली तर आपण जास्त सुखी होऊं असें समजून दान देऊं नका. सर्वांच्या बरोबर सुखी किंवा सर्वांच्या बरोबर दुःखी होण्यासाठीं ग्राम-दान करायचें आहे. ग्राम-दानानंतर मदतीसाठीं भीक मागायची असेल तर सगळे मिळून मागतील, उत्पादन वाढवायचें असेल तर सगळे मिळून वाढवतील, उपवास करायचा असेल तर सगळे मिळून करतील आणि चोरी करायची असेल तर सगळे मिळून करतील.

स्वराज्य मिळाल्यावर सुख च लाभेल अशी हमी आम्ही देत नव्हतों. दुःख वाढलें तरी चालेल, परंतु आम्हांला स्वराज्य हवें, असें आम्ही म्हणत होतों. तसें ग्राम-दान म्हणजे ग्राम-राज्य. समुद्र-स्नानांत ज्याप्रमाणें सर्व नद्यांच्या स्नानाचें पुण्य लाभतें, त्याप्रमाणें ग्राम-दानांत सर्व उपवासादींचें पुण्य लाभणार आहे. कुराणांत हि हें च सांगितलें आहे. 'रोजा' ( उपवास ) करणें हा धर्म सांगितला आहे. परंतु रोजा करूं न शकलांत तर गरिबांना खायला घाला म्हणजे रोजाचें पुण्य मिळतें, असें म्हटलें आहे. भावार्थ हा च कीं आसपासचे लोक उपाशी आहेत तोंपर्यंत अवांतर पुण्यकार्य हें पुण्यकार्य च नव्हे. गरिबांना खायला घालून खाणें

किंवा त्यांच्याबरोबर उपवास करणें यांत च पुण्य आहे. आणि ग्राम-दानांत हें च होत असल्यामुळें ग्राम-दान हें मोठें पुण्यकार्य आहे असें माझें म्हणणें आहे.

■ ■ ■

: ११ अ :

## ग्राम-दानानें खरी वर्ण-व्यवस्था आणि आश्रम-व्यवस्था

कांहीं लोक विचारतात कीं 'तुम्ही साऱ्या गांवाला ग्रामदानी बनवूं पाहतां, मग समाजांत वर्णाश्रम-धर्म कसा टिकायचा?' मी म्हणतों कीं धर्म ही सूक्ष्म वस्तु आहे. म्हणून जरा बारकाईनें विचार करायला हवा. चातुर्वर्ण्य किंवा चार आश्रम म्हणजे केवळ बाह्य वस्तु नव्हे. उच्च-नीच भाव म्हणजे वर्णधर्म नव्हे. जो स्वत:ला उच्च समजेल तो ईश्वराच्या दृष्टीनें सर्वांत नीच समजला जाईल. चार वर्णांची कल्पना समाजांत भेद वाढविण्यासाठीं नसून गुण-विकासासाठीं आहे. मी तर प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं चार वर्णांचे गुण असावेत असें म्हणेन.

ग्राम-दानानें गांवांत चार वर्णांची आणि चार आश्रमांची कशा रीतीनें स्थापना होते याचें मीं सूत्र च बनविलें आहे. चार वर्णांचीं जीं चार लक्षणें आहेत तीं ज्याच्या ठिकाणीं आहेत त्याच्या ठिकाणीं चारी वर्ण एकवटले असें समजावें.

हे चारी वर्ण अत्यंत पवित्र आहेत. लोकांचा असा समज आहे कीं कांहीं वर्ण उच्च तर कांहीं वर्ण नीच आहेत. परंतु ही चुकीची कल्पना आहे. गीता म्हणते "**आपुल्या आपुल्या कर्मीं दक्ष तो मोक्ष मेळवी.**"

चित्तामधें शांति असणें हें ब्राह्मणाचें लक्षण आहे. ग्राम-दानानें प्रत्येक गांवांत शांति नांदणार आहे.

दुसरा वर्ण क्षत्रियाचा. निर्भयता हें क्षत्रियाचें लक्षण आहे. ही निर्भयता शस्त्रानें येत नसते. दम म्हणजे स्वत:वर ताबा किंवा संयम. असा संयम राखणारे च खरे निर्भय बनूं शकतात. ग्राम-दानानें च दमाची, संयमाची, प्रतिष्ठा गांवांत वाढेल.

तिसरा वर्ण वैश्याचा. दया हें वैश्याचें लक्षण आहे. मांसाहार न करणारे जितके ब्राह्मण आहेत त्यांपेक्षां मांसाहार न करणाऱ्या वैश्यांची संख्या हिंदुस्थानांत जास्त आहे असें दिसून येईल. गरिबां-साठीं संग्रह करायचा ही दयाबुद्धि वैश्यांत असली पाहिजे. ग्राम-दानानें अशा वैश्य-धर्माची स्थापना होणार आहे.

चौथा वर्ण शूद्राचा. श्रद्धा हें शूद्राचें लक्षण आहे. शूद्र सेवा-प्रधान असतो. शूद्राशिवाय जगाचें चालायचें च नाहीं. परंतु श्रद्धा आणि भक्तिशिवाय खरी सेवा होत नाहीं. ग्राम-दानानें नव्या पिढीच्या चित्तांत श्रद्धा उत्पन्न होणार आहे. विष्णु ज्याप्रमाणें साऱ्या जगाचें पालन करतो त्याप्रमाणें सर्वांचें पालन-पोषण करण्याची जबाबदारी गांवाची राहील. ग्रामदानी गांवांत एखाद्याचा बाप मेला तर त्याला दुसरे शें दोनशें बाप लाभतील. अशा मुलांना त्या समाजाबद्दल किती श्रद्धा वाटेल याचा तुम्ही च विचार करा.

अशा रीतीनें शम (शांति), दम, दया, आणि श्रद्धा; या चार गुणांची जिथें स्थापना झाली तिथें चार वर्णांची स्थापना झाली असें समजा.

आतां चार आश्रमांची स्थापना ग्राम-दानानें कशी होईल तें पाहूं.

पहिला संन्यासाश्रम. समाजाला संन्यासी पुरुषांची अत्यंत जरूर असते. संन्यासी म्हणजे समाजाची फुकट सेवा करणारा सेवक. तो सर्वत्र ज्ञान-प्रचार करीत हिंडतो. ज्याच्या चित्तांत परिपूर्ण शांति नांदते तो संन्यासी. ग्राम-दानानें या शमरूपी संन्यासाश्रमाची आम्ही स्थापना करूं इच्छितों.

दुसरा वानप्रस्थाश्रम. वानप्रस्थाचें लक्षण म्हणजे दम. तपस्या करून इंद्रियांना ताब्यांत घेऊन जिकावें लागतें. ग्राम-दानानें आम्ही दमरूपी वानप्रस्थाश्रमाची स्थापना करूं इच्छितों.

तिसरा गृहस्थाश्रम. दया हें गृहस्थाश्रमाचें लक्षण आहे. तिरुकुरल देखील सांगतें कीं दया, प्रेम, करुणा, हें गृहस्थाचें श्रेष्ठ लक्षण आहे. ग्राम-दानानें आम्ही दयारूपी गृहस्थाश्रमाची स्थापना करूं पाहतों.

चौथा ब्रह्मचर्याश्रम. श्रद्धा हें या आश्रमाचें लक्षण आहे. श्रद्धेची प्रतिष्ठा झाली कीं ब्रह्मचर्याची प्रतिष्ठा झाली असें समजावें. ग्राम-दानानें आम्ही श्रद्धारूपी ब्रह्मचर्याश्रमाची प्रतिष्ठा करूं पाहतों.

अशा रीतीनें 'शम, दम, दया, आणि श्रद्धा' हें ग्राम-दानाचें सूत्र आहे. यांत चार वर्ण आणि चार आश्रम येऊन गेले. मग ग्राम-दानानें धर्मसंस्थापना, धर्मचक्रप्रवर्तन, होईल कीं नाहीं तें तुम्ही च पहा. म्हणून ज्या कोणाच्या चित्तांत परमेश्वरानें धर्मभावना ठेवली असेल त्या सर्वांनीं या कामांत पडून हें लवकरांत लवकर पूर्ण केलें पाहिजे.

■ ■

## जाती ऐवजीं वृत्ति : ११ ब :

या पुढें जातीचा विचार सोडून दिला पाहिजे. आतां जाती न राहतां वृत्ति राहतील. ग्रामसेवा ही च आमची वृत्ति असली पाहिजे. जो जोडे बनवील तो स्वत:ला चांभार न म्हणतां ग्राम-सेवक म्हणेल; सुतार स्वत:ला सुतार न म्हणतां ग्राम-सेवक म्हणेल. शिक्षक हि स्वत:ला ग्राम-सेवक च म्हणेल. विणकर, सुतार, शिक्षक या जाती नसून वृत्ति आहेत. हे सारे मिळून शेती करतील तेव्हां सारे च शेतकऱ्याशीं एकरूप होतील. एक सुतार-शेतकरी, दुसरा विणकर-शेतकरी, तिसरा शिक्षक-शेतकरी, चौथा मंत्री-शेतकरी; पांचवा न्यायाधीश-शेतकरी अशा रीतीनें प्रत्येक जण शेतकरी असेल आणि प्रत्येकाची एकेक वृत्ति असेल.

अशा सारखें ग्राम-राज्य आपल्याला बनवायचें आहे.

■ ■ ■

## तिरुमंगल तालुक्याचा पवित्र संकल्प : १२ :

१४ जानेवारी १९५७ ला विनोबांचा तिरुमंगलला मुक्काम असतांना विनोबांनीं कार्यकर्त्यांपुढें तालुका-दानाची मागणी ठेवली. तामिलनाडमधें पोंगल नांवाचा मोठा सण १४ जानेवारीला च असतो. विनोबांच्या मागणीवर गंभीरपणें विचार करण्यासाठीं तालुक्यांतील सर्व गांवांच्या प्रतिनिधींचें एक संमेलन भरविण्याचें त्या दिवशीं मंडळींनीं ठरविलें होतें.

त्याप्रमाणें २५ जानेवारीला गांधीनिकेतन कलुपट्टी येथें सुमारे पांचशें प्रतिनिधींचें संमेलन भरलें. संमेलनाला मद्रास राज्याच्या मुख्य मंत्र्यांचा पुढील प्रमाणें संदेश आला होता.

"भूदानाची चळवळ ग्रामदानांत विकसित होत असलेली पाहून मला फार आनंद होत आहे. मदुरा जिल्ह्यांतील १२७ गांवांनीं व्यक्तिगत मालकी सोडून आपली सर्व जमीन ग्राम-समाजाला अर्पण केली च आहे. आमच्या प्रदेशाला ही गोष्ट अभिमानास्पद आहे. आतां तेथील सगळे लोक एक परिवार बनून सुखी होण्याचा प्रयत्न करतील. हें काम दशकांच्या पटींनीं वाढावें असें मी इच्छितों.

या चळवळींत केवळ जमिनीचा च नव्हे तर इतर असंख्य प्रश्न सोडविण्याची नैतिक शक्ति भरलेली आहे असा माझा विश्वास आहे. कायद्यानें अशा प्रकारचें काम होण्यासारखें आहे असें मला वाटत नाहीं.

ग्रामदानी गांवांना मदत होईल असें कोणतें पाऊल आपण उचलावें यावर माझें सरकार विचार करीत असून या चळवळीचें काळजीपूर्वक अध्ययन करीत आहे.

प्रांतांतील सर्व कार्यकर्ते तालुकादानाची विनोबांची इच्छा पूर्ण करण्याचा कसोशीनें प्रयत्न करतील असा मला भरंवसा वाटतो."

तिरुमंगल तालुक्यांत एकूण २६७ गांवें असून लोकसंख्या पावणेचार लाख आहे. एक हजार ते दोन हजार वस्तीचीं गांवें

७३ असून ५०० पेक्षां कमी लोकवस्तीचीं गांवें ७८ आहेत. दोन ते पांच हजार वस्तीचीं गांवें ४७ आहेत. १० ते २० हजारांच्या वस्तीचीं गांवें २ आहेत.

या तालुक्यांत एकूण ८ फिरके आहेत. पांच पांच कार्यकर्त्यांच्या २५ टोळ्या तालुक्यांत फिरून पूर्ण ग्रामदानें मिळविण्याचा प्रयत्न करतील.

गांधीग्रामचे जी. रामचंद्रन् संमेलनांत बोलतांना म्हणाले, "आतांपर्यंत मी चळवळीपासून जरा दूर च होतों. परंतु विनोबा गांधीग्रामला आले त्यावेळीं त्यांच्या प्रभावी स्पर्शानें मी खेंचला गेलों. माझा अहंकार गेला. विनोबांनीं माझें हृदय तर जिंकलें च होतें. परंतु आतां माझी बुद्धि हि त्यांनीं जिंकली आहे. ही चळवळ महान् क्रांतिकारी असून ही यशस्वी झाल्याशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय नाहीं याबद्दल आतां माझ्या मनांत शंका राहिली नाहीं. ग्रामदान आणि तालुकादान यशस्वी न झालें तर आमचें सर्व रचनात्मक काम हि ढासळणार आहे. म्हणून हें काम केवळ बेरीज करीत बसण्याचें नसून गुणाकार करण्याचें आहे. तालुकादानाच्या मोहिमेची पूर्णाहुति शेंवटीं भारत-दानांत च आपल्याला करायची आहे."

कार्यकर्त्यांचीं भाषणें झाल्यानंतर सर्व सभेनें उभे राहून पुढील प्रतिज्ञा वाक्यशः उच्चारली. श्री वेंकटाचलपति यांनीं प्रतिज्ञा म्हणवून घेतली.

" मदुरा जिल्ह्यांतील तिरुमंगल तालुक्यांतील जवळ जवळ सर्व गांवांचे येथें जमलेले आम्ही प्रतिनिधि, आचार्य विनोबांच्या प्रेरणेनें आणि मार्गदर्शनानें भारताच्या कल्याणासाठीं सुरू झालेल्या भूदानयज्ञाच्या चळवळींतील महान् क्रांतिकारी उद्दिष्टाबाबत आपली निष्ठा व्यक्त करीत आहोंत. ही चळवळ यशस्वी झाली तर ग्रामराज्याचा खरा पाया रचला जाईल असा आमचा विश्वास आहे. गांधीजींनीं सुरू केलेल्या रचनात्मक कार्याची पूर्णता भूदानयज्ञानें होत आहे असें आमचें मत आहे.

तामिलनाडमधें भूदानाच्या चळवळीनें ग्रामदानाचें विकसितरूप धारण केलें असून आमच्या तालुक्यानें आतांपर्यंत पन्नास गांवें ग्रामदानांत दिलीं आहेत याबद्दल आम्हांला साभिमान हर्ष होतो. तालुकादानाच्या कल्पनेचा उगम आमच्या तालुक्यांत च झाला असून तो सिद्ध करण्याचा संकल्प करण्यासाठीं आज आम्ही येथें जमलों आहोंत. परमेश्वरानें आमच्या प्रयत्नांना आशीर्वाद द्यावा अशी आम्ही प्रार्थना करतों.

आज ह्या ठिकाणीं आम्ही गंभीरपूर्वक प्रतिज्ञा करीत आहोंत कीं यापुढें आम्ही सगळे एक दिलानें काम करूं, आमच्यांत असलेली सर्व शक्ति एकवटूं, आणि सर्वांच्या सहकार्यानें पुढील तीन महिन्यांत आमचा संपूर्ण तिरुमंगल तालुका विनोबांना दान करूं."

■ ■ ■

## प्रेम व्यापक करण्याचा कार्यक्रम : १३ :

तिरुमंगल तालुक्यांत एक मोठें च काम होऊन राहिलें आहे. सारा तालुका ग्रामदानांत देण्याचा प्रयत्न आहे. शेंकडों कार्यकर्ते त्या कामीं लागले आहेत. हा एक अद्‌भुत च विचार आहे.

ग्राम-दान किंवा तालुका-दान म्हणजे शेंवटीं काय आहे याचा नीट विचार करा. तालुका-दान झालें तर बाबा कांहीं त्या तालुक्याची सारी जमीन घेऊन जाणार नाहीं. तालुकादान याचा अर्थ हा कीं त्या तालुक्यांतील गांवांनीं आपली व्यक्तिगत मालकी सोडली आणि आपलें जीवन समाजाला अर्पण केलें. परंतु हें प्रेमाशिवाय व्हायचें नाहीं.

मनुष्य प्रेमांतून उत्पन्न झाला, प्रेमानें च त्याचें पालन होतें, आणि मरतांना प्रेम मागें ठेवून च मरतो. त्यामुळें प्रेमाचें शिक्षण समाजाला नव्यानें द्यायचें आहे असें नव्हे. परंतु हें प्रेम आज फक्त कुटुंबापुरतें मर्यादित आहे. कुटुंबांत हक्काची भाषा नसते, कर्तव्याची भाषा असते. कुटुंबांत एकमेकांबद्दल त्यागाची भावना असते म्हणून प्रेम नांदतें. कुटुंबांत असणारी ही प्रेमभावना समाजासाठीं व्यापक करणें याला च कुटुंब व्यापक करणें म्हणायचें.

गांवांत जर चार पांचशें घरें असतील तर तीं सर्व मोडून छात्रालयाप्रमाणें सर्वांनीं एकत्र रहायचें असा मात्र याचा अर्थ नव्हे. आज प्रत्येकाच्या घरांत अलग स्वयंपाक होतो तो बंद करून सर्वांचा स्वयंपाक एके ठिकाणीं करायचा असा याचा अर्थ नाहीं. आज प्रत्येक कुटुंब आपापली शेती करीत काहे तशी न करतां ट्रॅक्टरनें सामूहिक शेती करायची असा हि याचा अर्थ नाहीं.

सोयीसाठीं प्रत्येक घर वेगळें च राहील. प्रत्येक कुटुंबांत स्वतंत्र च स्वयंपाक होईल, परिवारांतील व्यक्तींच्या हिशोबानें प्रत्येक कुटुंबाची वेगळी शेती राहील; हें सर्व असेल. परंतु ग्रामदानी गांवांत व्यक्तिगत मालकी राहणार नाहीं. सर्वांचें सुख-दुःख तें आपलें सुख-दुःख या भावनेनें सर्वजण एकमेकांच्या मदतीला धावून जातील.

आपल्याला कुटुंब-संस्था तोडायची नाहीं. तो तर प्रेमाचें शिक्षण मिळण्याचा पाया आहे. कुटुंब असल्यामुळें च प्रेमाचा, सेवेचा, त्यागाचा अभ्यास होतो. परमेश्वराची रचना किती दयाळु आहे पहा. प्रत्येक मुलाला माता दिली असल्यामुळें मातेच्या दुधाबरोबर मुलाला प्रेमाचें बाळकडू मिळत असतें. ही जर योजना नसती तर प्रेमाचें शिक्षण देण्याची स्वतंत्र योजना शाळेंत करावी लागली असती. आणि शाळेंत तें कितपत साधलें असतें कोण जाणे ! आज शिक्षणाच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें विषमता आढळते त्याप्रमाणें प्रेमाच्या क्षेत्रांत हि विषमता, पक्षपात, इत्यादि दिसून आला असता आणि समाज निष्ठुर बनला असता.

म्हणून प्रेम-भावना व्यापक करण्याच्या आड ज्या ज्या वस्तु असतील त्यांवर आपण प्रहार केला च पाहिजे. जोंपर्यंत भेदभाव राहतील तोंपर्यंत शक्ति वाढणार नाहीं. हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

■ ■ ■

## आपल्या कामाचें पथ्य : १४ :

हल्लीं फिरका-दान, तालुका-दान वगैरेची हवा चारी बाजूला पसरली आहे. निवडणुका संपल्या आहेत. भूदान समित्या विसर्जित केल्यानंतर कार्यकर्त्यांची संख्या कमी झाली नसून वाढली च आहे. आज शेंकडो कार्यकर्ते या कामीं लागले आहेत. पुढें हजारों लागतील. एखादें मोठें काम अल्प अवधींत पार पाडायचें झाल्यास कार्यकर्त्यांची संख्या हि मोठी लागते हें खरें असलें तरी आपल्या या कामाच्या मुळाशीं दोन शक्ति आहेत.

एक शक्ति ही कीं हा विचार सत्य आहे. जमिनीची मालकी मनुष्याची असूं शकत नाहीं यांत शंका नाहीं. जोंपर्यंत अशी मालकी जगांत चालू राहील तोंपर्यंत जगांत शांति नांदणार नाहीं यांत हि शंका नाहीं. आजच्या विज्ञानाच्या युगांत लोक अलग-अलग राहून काम करूं पाहतील तर टिकणार च नाहींत. मालकीचा विचार आत्मज्ञानाच्या विरुद्ध आहे यांत हि शंका नाहीं. तसें च ग्रामदानानें जमिनीचें उत्पन्न वाढण्यास मदत च होणार आहे अशा रीतीनें हा एक पूर्ण आणि शुद्ध विचार आहे.

दुसरी शक्ति प्रेमाची. कित्येकदां सत्य कार्य देखील द्वेषानें, हिंसेनें किंवा जबरदस्तीनें करण्यांत येतें. परंतु तो अधर्म आहे. आपल्या कामांत समोरच्या माणसाबद्दल प्रेम असणें हें कार्य सफल होण्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. जमिनीची आसक्ति राखणारांची निंदा करून चालायचें नाहीं. ती आसक्ति कशी सोडवायची या बाबत सर्वांनीं मिळून चर्चा करणें, प्रेमानें विचार समजावणें हा च योग्य मार्ग आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळमत.

वि: निबंध
अनुक्रम 22735
क्रमांक 2353 नोंः दिः 25/2/64

येथें कार्यकर्ते जमले असल्यामुळें या गोष्टीकडे मी मंडळींचें लक्ष वेधीत आहें. ग्रामदान प्राप्त करण्याचें काम प्रेमानें च होणार. ग्रामदान मिळविण्यापेक्षां ग्रामराज्य स्थापन करणें जास्त कठिण काम आहे. या कामीं अनेकांचीं मतें भिन्न असूं शकतील. परंतु कार्यकर्त्यांनीं, आपल्या च मताचा आग्रह राखूं नये. विचाराची देवाण घेवाण करावी. यांतून एखादा सर्व संमत मार्ग निघूं शकेल. परंतु इतक्या ऊपर हि मतभेद राहिले तर प्रत्येकानें एखादें गांव निवडून आपल्या कल्पनेप्रमाणें त्या गांवांत काम करावें. आपण या कामासाठीं सर्वोदय मंडळें स्थापन केलीं आहेत. परंतु तीं मंडळें फक्त सेवा-मंडळें आहेत, सत्ता-मंडळें नव्हेत. विचार-भेद असून हि परस्परांत प्रेमभाव राखणें ही कठिण गोष्ट असली तरी अहिंसेचा विकास त्याशिवाय होणार नाहीं.

दुसरी गोष्ट ही कीं कार्यकर्त्यांनीं परस्परांबद्दल क्षमावृत्ति राखली पाहिजे. कार्यकर्ते सर्व दोष-रहित असणें शक्य च नाहीं. आपण स्वत: चुका कितीतरी करतों. असें असून आपण आपल्याला क्षमा च करीत जातों. मग दुसऱ्याच्या बाबतींत तर क्षमावृत्ति अधिक च असली पाहिजे.

तिसरी गोष्ट ही कीं दुसऱ्याच्या हेतूबद्दल शंका घेत बसूं नये. अमुक मनुष्य अमुक गोष्ट कोणत्या उद्देशानें बोलला असेल याबद्दल उगीच च आपण विपरीत कल्पना करून घेत असतों. एक-मेकांबद्दल सद्भाव राखला नाहीं तर अहिंसा टिकेल का ?

या तीन गोष्टी लक्षांत घेऊन कार्यकर्ते मिळून मिसळून काम करतील तर ग्रामराज्याचें सुंदर चित्र निर्माण होऊं शकेल. हायड्रोजन आणि ऑक्सिजन मिळून ज्याप्रमाणें पाणी बनतें त्या-

प्रमाणें सत्य आणि प्रेम मिळून अहिंसा बनते. अशा रीतीनें अविरोध वृत्तीनें, आणि मिळून मिसळून काम करण्याची वृत्ति आम्हांला साधो अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों.

■ ■ ■

## परिग्रह हें चोरीचें मूळ :१५:

कांहीं लोक म्हणतात कीं रोमन कॅथलिक व्यक्तिगत मालकी ही पवित्र वस्तु मानतात. मला वाटतें कीं असें मानण्यांत अज्ञान आहे. व्यक्तिगत मालकीचा अर्थ त्यांच्या मनांत काय आहे तें मला माहीत नाहीं. प्रत्येक व्यक्तीची मालमत्ता अलग अलग मान्य केली तर कुटुंब-विच्छेद होईल. भूदानामधें कुटुंब-विच्छेद करण्याचा विचार नसून कुटुंब व्यापक करण्याचा विचार आहे. आपण समाजाची सेवा करूं तर समाज आपली सेवा करील. बाप मुलाची सेवा करील तर मुलगा बापाची सेवा करील. आपल्या कुटुंबामार्फत आपण साऱ्या समाजाची सेवा करायची आहे. कुटुंब व्यापक बनवून व्यक्तीचें स्वतंत्र स्वामित्व समाजाच्या व्यापक स्वामित्वांत लीन करायचें आहे. नदी समुद्रांत लीन झाल्यानें लहान बनत नाहीं, तर मोठी बनते.

रोमन कॅथलिक चर्च या विचाराचा विरोध करीत असेल असें मला वाटत नाहीं. येशूनें काय शिकवण दिली त्याबद्दलची पुढील कहाणी प्रसिद्ध च आहे. एकदां एक जण येशूकडे येऊन म्हणाला कीं "मला बोध द्या." येशूनें कांहीं गोष्टी त्याला सांगितल्या. तो म्हणाला, "या गोष्टींचा अंमल मी करीत च आहें. मला विशेष बोध द्या." तेव्हां येशू म्हणाला कीं, "तुझ्याजवळ जी काय संपत्ति

असेल ती गरिबांना वाटून दे आणि मग माझ्याकडे ये." याचा काय अर्थ झाला ? आपण कोणाच्या हि व्यक्तिगत मिळकतीवर जबरदस्तीनें हल्ला करूं नये ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु स्वेच्छेनें जर कोणी आपली मिळकत समाजासाठीं सोडून देत असेल तर ती गोष्ट कोणत्या हि धर्माच्या विरुद्ध असेल असें मला वाटत नाहीं.

व्यक्तिगत परिग्रहाबाबत हि जरा खोल जाऊन विचार केला पाहिजे. समजा कीं एखाद्या माणसाजवळ भरपूर परिग्रह आहे आणि समाजांतील बाकीचे लोक उपाशी आहेत, तर त्या व्यक्तीचा जादा परिग्रह लोकहिताच्या दृष्टीनें कमी करण्याचा अधिकार समाजाला आहे. याला च अपरिग्रह आणि अस्तेय म्हणायचें. अधिक संग्रह न करण्याला अपरिग्रह म्हणतात, आणि चोरी न करण्याला अस्तेय म्हणतात. दोन्ही वस्तु मिळून धर्म पूर्ण होतो. चोरी करणें अधर्म आहे, ही वस्तु आज समाजाला मान्य आहे. परंतु अधिक संग्रह करणें हा हि अधर्म आहे, ही वस्तु अजून लक्षांत आलेली नाहीं. परंतु तें चूक आहे. समाजांत संग्रह वाढला म्हणजे च चोरीची प्रवृत्ति वाढत असते. म्हणून चोरी करणें पाप आहे तसा अधिक संग्रह करणें हि पाप आहे.

हें मी पदरचें सांगत नाहीं. याबाबत येशूनें इतकें कठोर वाक्य उच्चारलें आहे कीं कोणता हि कम्युनिस्ट त्यापेक्षां कठोर काय बोलणार ? "सुईच्या छिद्रांतून एखादा उंट हि एखादे वेळीं पसार होईल परंतु धनी मनुष्याला स्वर्गांत प्रवेश मिळणें दुरापास्त आहे." या वाक्यांत परिग्रहाचा तीव्र निषेध प्रकट होत आहे.

चोरी करणें पाप आहे हें सर्व च धर्म सांगतात. परिग्रह हें च चोरीचें मूळ आहे. तें मूळ कारण शिल्लक ठेवून चोरी समाजांतून कधीं च नष्ट होणें शक्य नाहीं. म्हणून कम्युनिस्ट म्हणतात कीं "अपहर्त्यांचें च अपहरण करा." मी म्हणतों कीं "अपहरण करणाराचें अपहरण करण्याच्या भानगडींत कां पडतां ? अपरिग्रहाची च गोष्ट कां बोलत नाहीं ?" तर ते म्हणतात "अपरिग्रह असावा असें तुम्ही किती हि बोलत राहिलांत तरी कोण परिग्रह सोडतो आहे ? मोठा परिग्रह जवळ बाळगून मूठभर दान देतात आणि पुण्य संपादन करतात. अशा रीतीनें इहलोक आणि परलोक दोन्ही साधण्याची या लोकांची युक्ति आहे." या टीकेंत तथ्य आहे. जी मूळ वस्तु करायला पाहिजे ती आपण करीत नसल्यामुळें दुसऱ्या बाजूनें तीव्र प्रतिक्रिया समाजांत सुरू होते. परिग्रह सोडायला तयार न झालांत तर कोणती ना कोणती चोरी तुम्हांला पतकरावी च लागेल. व्यक्तीनें केलेली चोरी मान्य करणार नसाल तर शास्त्रीय चोरी मान्य करावी लागेल. शास्त्रीय चोरी म्हणजे कायदा करून परिग्रह हिसकून घेणें. म्हणून कायद्यानें मान्य केलेली चोरी कबूल करणें किंवा अपरिग्रहाचें पालन करणें या दोन गोष्टींहून तिसरी गोष्ट च उरत नाहीं.

म्हणून माझें म्हणणें आहे कीं अपरिग्रहाचें पालन करण्यास शिका. व्यक्तिगत मालकी समाजाला समर्पण करा. या योगानें समाजांत आध्यात्मिक शक्ति प्रकट होईल, जगांत कारुण्याचा अविर्भाव होईल, धर्माचें तेज वाढेल, आणि आस्तिकता वाढेल. या म्हणण्यावर धार्मिक लोक आक्षेप घेऊं लागतात तेव्हां मी त्यांना नम्रपणें सांगू इच्छितों कीं त्यांनीं जरा सूक्ष्मपणें धर्माचें अध्ययन करावें.

मी तुम्हांला त्यागाची शिकवण देऊन संन्यासी बनवूं पाहत नाहीं. उलट त्याग शिकवून उत्तम भोगी बनण्यास सांगत आहें. उत्तम भोग त्यागाच्या द्वारें च साधणार आहे. घरोघर माता मुलांसाठीं त्याग करतात म्हणून च कुटुंबांत आनंद नांदतो. जें कुटुंबांत करतां तें च गांवांत करा असें बाबा सांगत आहे.

■ ■ ■

## ग्रामदान + ग्रामोद्योग = ग्रामोत्थान : १६ :

शेतीशिवाय जगांतील कोणत्या हि राष्ट्राचें चालायचें नाहीं, तसें भारतापुरतें बोलायचें तर ग्रामोद्योगाशिवाय त्याचें चालायचें नाहीं. सर्व च देशांच्या बाबतींत असें म्हणतां यायचें नाहीं. जिथें मनुष्यशक्ति कमी आणि जमीन जास्त असें असेल तिथें यंत्रांचा उपयोग करावा लागेल. आणि यंत्रोद्योग हि उभे करावे लागतील. परंतु ज्या देशांत जमीन कमी आणि मनुष्यशक्ति जास्त असें असेल त्या देशांत शेतीसाठीं मोठमोठीं यंत्रें चालायचीं नाहींत, आणि उद्योग हि ग्रामोद्योगांच्या धर्तीवर च आधारावे लागतील.

आणि ग्रामोद्योग देखील स्वतंत्रपणें टिकायचे नाहींत. गांवच्या सर्व लोकांनीं मिळून संकल्प केल्याखेरीज ग्रामोद्योग वाढायचे नाहींत. कांहीं व्यक्ति ग्रामोद्योगाचा अंमल करीत राहिल्या तरी ग्रामोद्योग देशव्यापी व्हायचे असतील तर ग्राम-संकल्पाशिवाय चालायचें च नाहीं.

आणि असा ग्रामसंकल्प बनण्यासाठीं सारा गांव एका कुटुंबासारखा झाल्याखेरीज ग्रामसंकल्प हि शक्य नाहीं. गांवांत विषमता असली तर ग्राम-समिति हि कार्यक्षम होणार नाहीं. ही विषमता जाण्यासाठीं ग्रामदान हा च एक इलाज आहे.

भावार्थ असा कीं (१) ग्रामोद्योगांशिवाय ग्रामोत्थान शक्य नाहीं (२) सुव्यवस्थित ग्रामयोजनेशिवाय व्यापक ग्रामोद्योग शक्य नाहींत (३) ग्राम-समितीशिवाय ग्रामयोजना शक्य नाहीं, आणि (४) ग्रामदान होऊन जमिनीचें समान वांटप झाल्याशिवाय ग्रामसमितीला साऱ्या गांवाची मान्यता मिळणें शक्य नाहीं.

म्हणून ग्रामदान, ग्रामोद्योग आणि ग्रामोत्थान या वस्तु एकमेकांपासून वेगळ्या राहूं शकत नाहींत.

■ ■ ■

## ग्राम-दानांत सगळे च खुष : १७ :

आज व्यंकटाचलपतींच्या गांवीं मी येऊन पोंचलों याबद्दल मला आनंद होत आहे. आम्ही दोघे एका च विचाराचे आहोंत. स्वराज्याच्या चळवळींत त्यांनीं भाग घेतला होता. त्यानंतर ग्राम-राज्याची त्यांना धुन लागली. ती च धुन मला हि आहे. त्यामुळें आम्ही एक प्रकारें सहोदर च आहोंत. स्वराज्याच्या चळवळींत अनेकांनीं भाग घेतला. परन्तु स्वराज्यानंतर ग्रामराज्य स्थापन करण्याचा विचार कांहींना लक्षांत आला नाहीं, तर कांहींना पसंत पडला नाहीं. इंग्रजांची सत्ता जावी एवढ्यापुरता च त्यांचा आमचा साथ होता. अशा लोकांना फार तर सहयोगी म्हणतां येईल, पण सहोदर म्हणतां येणार नाहीं. म्हणून जे सहयोगी होते ते स्वराज्यानंतर आमच्यापासून वेगळे झाले आणि जे सहोदर होते ते आमच्याबरोबर कामाला लागले.

अशा रीतीनें आमचा हा एक वेड्यांचा समाज आहे. हा समाज बुद्धिमान् लोकांचा असला तरी लहान असल्यामुळें जगांत वेड्यांचा च समजला जातो. हल्लीं बहुमताचें युग आहे. ग्राम-

राज्यवाली आम्ही मंडळी अगदीं च अल्पमतांत आहोंत. म्हणून आम्ही वेडे समजले जातों. परन्तु जे खरे वेडे असतात ते समाजामधें आपल्या वेडेपणाची च दीक्षा लोकांना देत असतात. अशी दीक्षा देण्यासाठीं च मीं भूदान चळवळ सुरू केली आहे.

लोकांना मोठें आश्चर्य वाटतें कीं भूदानामधें काँग्रेसचे लोक, पी. एस्. पी. चे लोक, साम्यवादी लोक, सगळे कसा भाग घेतात ! परंतु हें समजायला कांहीं च कठिण नाहीं. एक उत्तम स्वच्छ पाण्याचा झरा असतो. त्या झऱ्यावर वाघ हि पाणी पितो आणि गाय हि पाणी पिते. वास्तविक दोघांची आपसांत मैत्री नाहीं. परंतु झऱ्याचें पाणी दोघांना हि हवें असतें. म्हणून दोघे हि झऱ्यावर येतात.

भूदानाचें काम झऱ्याप्रमाणें जीवनदायी असल्यामुळें सर्वांना प्रिय होतें. परंतु स्वार्थामुळें ज्यांना तें प्रिय होत नाहीं ते यापुढें समाजांत टिकायचे नाहींत.

अर्थशास्त्री म्हणतात कीं सारें गांव एक झालें तर गांवाची अर्थरचना उत्तम करतां येतें.

समाजशास्त्री म्हणतात कीं ग्रामदानानें जातिभेद नाहींसे होण्यास मदत मिळते.

राजकारणी लोक तर ग्रामदानावर बेहद खुष आहेत. प्रत्येक गांवाचा एक गट तयार झाला तर स्वराज्याची शक्ति वाढेल, देशांत शांति नांदेल, खेड्यांत ज्ञान वाढेल, आणि चांगलें व्यवस्थापक तयार होतील, हें त्यांना पटतें.

शिक्षणशास्त्री ग्रामराज्यावर एवढ्यासाठीं खुष आहेत कीं त्यानें गांवांतील सर्व मुलांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था करतां

येते. जमीनदारांचीं मुलें शेती करीत नाहींत आणि शेतकऱ्यांचीं मुलें शाळेंत जाऊं शकत नाहींत. परंतु ग्रामदानानंतर सर्व मुलें काम करतील आणि सर्व मुलें शिक्षण घेतील.

धार्मिक लोक ग्रामदानाच्या विचारानें नाचूं च लागतात. 'मी' 'माझें' हा भाव यामुळें नाहींसा होतो. अनेक धर्मग्रंथ ममत्व सोडायला सांगतात. पण कोण ऐकतो ? लोक म्हणतात 'ममत्व सोडणें संन्याशाला साधणार. आम्ही पडलों संसारी लोक.' परंतु उपनिषदांच्या हजारो वचनांनीं जें होऊं शकलें नाहीं तें जीवनाची एक सामूहिक योजना केल्यानें झालें, असें पाहून धर्मनिष्ठ लोक खुष झाले आहेत.

देशांत "कायदा आणि सुव्यवस्था" राखण्याची ज्यांची जबाबदारी आहे ते म्हणतात, "ग्रामदानामुळें आतां समाजांत अनिष्ट प्रवृत्तींना आळा बसेल." हल्लीं बेकारीमुळें लोकांना काम मिळत नाहीं. घरीं पोरेंबाळें भुकेनें तडफडतात म्हणून हे लोक रात्रींचें काम (चोरी) करतात. त्यांच्यावर खटला चालवून त्यांना तुरुंगांत टाकतात. पण तिथें भरपूर खाणें, भरपूर झोंप, आणि नियमित काम, यांमुळें ते निश्चिंत होऊन जातात. आणि शिक्षा होते त्यांच्या घरच्यांना. कमावणारा जेलमधें पडला तर घरच्यांनीं काय खायचें ? हा काय न्याय झाला ? यानें शांति कशी नांदणार ?

लोक म्हणतात "भूदानाच्या कामाला सरकार अनुकूल झाल्यामुळें आतां बाबाचा बचाव सरकार करून घेईल." परंतु वस्तुस्थिति उलटी आहे. अरे, बाबा च सरकारचा बचाव करीत आहे. सरकारी कायद्यांत तर व्यक्तिगत मालकीला पूर्ण रक्षण देण्यांत आलें आहे. त्याच्या बचावासाठीं घटना, सेना, कोर्ट सर्व

उभे आहेत. परंतु खाजगी मालकी ही चुकीची वस्तु आहे, जमिनीवर मालकी सांगणें हें पाप आहे, असें कुठें कायद्यांत लिहिलें आहे का? परंतु बाबा तर खाजगी मालकी पाप आहे असा च प्रचार करीत आहे. असें असतांना सरकार बाबाच्या कामाला चांगलें काम आहे असें म्हणत आहे. मग तुम्ही च सांगा कीं बाबा सरकारला वाचवीत आहे कीं सरकार बाबाला वाचवीत आहे? मी तर म्हणतों कीं सरकारनें "लॉ अँड ऑर्डर" वर खर्च करण्याची सर्व रकम मला देऊन टाकावी. कारण त्यांचें शांतता राखण्याचें काम फुकटांत होऊन जात आहे!

एकूण सर्व लोक ग्रामदानावर खुष आहेत. मग नाराज कोण आहेत? लोक म्हणतात कीं ज्यांच्यापाशीं जमीन आणि संपत्ति अधिक आहे त्यांना ग्रामदान नुकसानीचें वाटतें. परंतु ज्यांत सर्वांचें भलें असतें त्यांत व्यक्तीचें हि भलें असतें ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. जवळ संपत्ति ठेवणाऱ्यांना स्वतःच्या मुलाचें भय वाटतें, चोरांचें भय वाटतें, समाजाचें भय वाटतें. हें भय नाहींसें करण्यासाठीं च ग्रामदान आहे.

आतां तालुकादान आणि जिल्हादान अशा गोष्टी सुरू झाल्यामुळें व्यंकटाचलपतींचें हें गांव ग्रामदानांत सामील होईल अशी तर आशा जरूर करायला हवी. तामिलनाडमधें एक मोठें आंदोलन चालू झालें आहे. दहा महिने खणल्यानंतर आतां कोठें पाणी लागलें आहे. पण आणखी खोल खणण्याची गरज आहे. कारण हा झरा अजून लहान असल्यामुळें उन्हाळ्यांत सुकून जाण्याची धास्ती आहे. येथील सगळे लोक खोदकामांत प्रवीण बनतील अशी मला आशा आहे.

■ ■ ■

## ग्रामदानाची पुढची पायरी : तालुकादान : १८ :

भूदानाचें काम करणारे एक कार्यकर्ते मला आज भेटायला आले होते. त्यांना मीं सांगितलें कीं "आतां ग्रामदानाच्या जागीं तालुकादान सुरू करून द्यायला हवें. ओरिसांत ग्रामदान भरपूर झालें. आतां पुढचें पाऊल टाकलें पाहिजे." माझें हें म्हणणें ऐकून लोक म्हणतील "बाबाची भूक वाढत चालली." आणि तें खरें हि आहे. हिंदुस्थानांतील सर्व जमिनीचें स्वामित्व-विसर्जन झालें पाहिजे, हिंदुस्थानांतील सर्व गांवांचें ग्रामदान झालें पाहिजे, ही बाबाची आकांक्षा आहे. पाऊस पडतो तेव्हां गांवोगांव, प्रत्येक तालुक्यांत, आणि साऱ्या देशांत पडतो. एका गांवांत ग्रामदान झालें तर दुसऱ्या गांवांत कां होऊं नये? म्हणून तालुकेच्या तालुके ग्रामदानांत मिळाले पाहिजेत.

परंतु हें व्हायचें कसें? जबरदस्ती करून हें काम होणार नाहीं. मिठाई गोड लागते हें ज्याला कळलें तो स्वतः मिठाई खाईल आणि इतरांना खायला सांगेल. अशा रीतीनें मिठाईचा प्रचार होतो. ती जर कडू वस्तु असती तर खाणारानें ती खाऊन थुंकून टाकली असती आणि इतरांना तो सांगत सुटला असता कीं "मीं खाऊन पाहिली. पण कडू आहे रे कडू. तुम्ही खाऊं नका." आणि मग ती वस्तु कोणी च खाल्ली नसती. म्हणून ग्रामदान गोड आहे कीं कडू आहे हें तपासून घ्या.

ग्रामदानांत सगळे एकमेकांची चिंता वाहतील. परंतु आज काय होत आहे? एखाद्याच्या घरीं लग्न निघालें. दोनशें रुपये पाहिजेत. परंतु घरीं पैसा नाहीं. मुलीचा बाप सावकाराकडे जातो. सावकार म्हणतो "वीस टके व्याज घेईन." हा म्हणतो 'कबूल.'

पण सावकार म्हणतो "कायद्यानें १० टक्यापेक्षां जास्त व्याज घेतां येत नाहीं. म्हणून दोनशें रुपये देऊन ४०० रु. दिले असें लिहून घेईन. आहे कबूल ?" बिचारा नडलेला असतो. नाइलाजानें कबूल होतो आणि कर्ज काढून लग्न करतो. लग्नांत सगेसोयरे, मित्र-मंडळी, जेवायला आली. मिष्टान्नाचें जेवण झालें. लोक खुष झालें. 'कल्याण' (तमीळ भाषेंत लग्नाला 'कल्याण' म्हणतात) झालें. परंतु मुलीच्या बापाचा सर्वनाश झाला. कारण तो आतां जन्मभर तें कर्ज फेडीत बसेल. हें सर्व गांवकऱ्यांच्या डोळ्यांदेखत होतें. परंतु ते तमाशा पाहतात.

यासाठीं साऱ्या गांवानें आपला एक परिवार समजून कोणाच्या हि घरचें लग्न तें आपलें लग्न असें समजून प्रत्येकानें थोडा थोडा हातभार लावला पाहिजे. कोणी श्रीमंत असो कीं गरीब असो, लग्नासाठीं लग्नवाल्याच्या घरचा खर्च होतां कामा नये, असा धर्म-नियम च असायला पाहिजे. लग्न जमविणें मातापित्यांचें काम आहे. परंतु लग्न पार पाडण्याचें काम साऱ्या गांवाचें असलें पाहिजे. प्रत्येक घरांतून आठ आणे किंवा एक रुपया वसूल करायचा. वर्षाकाठीं गांवांत तीन चार लग्नें झालीं तर लग्नासाठीं प्रत्येक घराला तीन चार रुपये खर्च येईल. म्हणजे लग्नाची बँक प्रत्येक घरांत आहे असें व्हायला हवें.

दुसरें उदाहरण पहा. शेतांत पीक उभें आहे. प्रत्येक शेतकरी शेतांत माळा बांधून जागत राहतो. याला विचारावें "तूं कां जागतोस रे ?" तर तो म्हणतो "शेजाऱ्याचे बैल माझ्या शेतांत येऊं नयेत म्हणून." शेजारच्याला विचारावें "तू कां जागतोस रे ?" तर तो म्हणतो "याचे बैल माझ्या शेतांत येऊं नयेत

म्हणून." म्हणजे दोघांनीं एकमेकांच्या बैलांची भीति बाळगून जागत रहायचें. आपसांत प्रेमानें व्यवस्था नाहीं करतां येत का ? ज्यानें त्यानें आपले बैल दुसऱ्याच्या शेतांत घालण्याचा प्रयत्न करायचा असेल तर एका गांवांत राहता च कशाला ? हें जंगली जनावरासारखें झालें. सर्व गांवकऱ्यांनीं मिळून पाळीपाळीनें एक दोन माणसांना जागण्याचें काम सोंपवावें आणि बाकी सर्वांनीं आराम करावा. हें सोपें नाहीं का ? पण हें सुचणार नाहीं. कारण जो तो आपल्यापुरता विचार करतो.

तिसरें उदाहरण. गांवांत भांडण झालें. चालले शहराच्या कोर्टांत. वकिलाचें फावलें. फिर्याद दाखल झाली आणि २५ जानेवारी तारीख ठरली. चालले दोघेजण परत. २५ ता. ला दोघे हि शहरांत आले. परंतु कोर्टानें सांगितलें कीं इतर महत्त्वाचें काम असल्यामुळें तुमचा खटला १८ फेब्रुवारीला. आले परत. पुनः १८ फेब्रु. ला गेले. खटल्याची तारीख १२ मार्च झाली. असें करीत करीत मे महिन्याची सुटी आली म्हणून १० जूनला कोर्टानें बोलावलें. पावसाळा तोंडाशीं येऊन ठेपला. आतां हा पेरणी करील कीं कोर्टाची तारीख सांभाळील ? बिचारा पेरणी दुसऱ्यावर सोंपवून कोर्टांत धावतो. अशा रीतीनें दोघे हि हेलपाटे घालत राहतील. पण दोघांना अशी अक्कल सुचणार नाहीं कीं गांवचा झगडा गांवांबाहेर नेऊं नये. परंतु गांव हें एक कुटुंब आहे ही जाणीव नसल्यामुळें असें होतें. अशानें गांवाचा बचाव कसा व्हायचा ?

शहरें खेड्यांना कशीं लुटतात पहा. तुमच्या हातांत बैल आणि तुमच्या हातांत शेत. परंतु तुम्ही हि बैल च बनलां. शेतांत

कापूस पेराल पण गांवांत सूत कांतणार नाहीं कीं विणणार नाहीं. बाहेरून कापड घ्याल. ऊंस पेराल, शेंगदाणा लावाल; पण गूळ, साखर, शहरांतून विकत घ्याल, आणि तेल मिलचें घ्याल. विकत घ्यायला लागतो पैसा. तो खेड्यांत उत्पन्न होत नाहीं. तो बनतो नाशिकच्या छापखान्यांत. एकदां ठप केलें कीं एक रुपयाची नोट, आणि एकदां च ठप केलें कीं शंभर रुपयांची नोट!! पण एका रुपयाचें धान्य निर्माण करायला जितकी मेहनत लागते त्याच्या शंभरपट मेहनत शंभर रुपयांचें धान्य निर्माण करायला लागते. परंतु आम्ही असे मूर्ख नि बावळे बनलों कीं घरचें दूध, तूप, भाजी, फळ, धान्य, विकतों आणि बदल्यांत कागदाच्या नोटा घेतों. सहा रुपये शेराचें तूप साडेचार रुपयांवर आलें. कां रे बाबा? वर्तमानपत्रांत बातमी आली कीं धारापूरचा भाव घटला. झालें याचें नुकसान! हा म्हणतो 'काय करावे? आपल्या हातांत काय आहे?' अरे, तुझ्या हातांत नाहीं तर कोणाच्या हातांत आहे? गांववाले सगळे एक बना. आधीं खा, आणि मग विका. देवानें तुम्हांला तोंड नाहीं दिलें का? तूप कडू लागतें का? मुलांना कां नाहीं खाऊं घालत?

परंतु हें सर्व तुम्ही खाऊं शकत नाहीं. कारण सगळ्या वस्तु शहरांतून विकत आणण्यासाठीं पैसा पाहिजे. खेड्यांत बनलेला माल तुम्हांला महाग वाटतो. म्हणून खेड्यांत कोणता च धंदा चालत नाहीं आणि सगळे मिळून मार खातात.

समजा कीं गांवांत ३०० माणसें आहेत आणि ३५० एकर शेती आहे. तर माणशी एक एकराप्रमाणें सर्वांना जमीन वाटून द्यावी आणि ५० एकर गांवासाठीं ठेवून ती सामुदायिक पद्धतीनें

व्हावी. दहा वर्षांनीं जमिनीची फेरवाटणी करावी. एखाद्याच्या घरांत माणसें कमी झालीं असतील तर त्याला कमी जमीन मिळेल. एखाद्याच्या घरांत वाढलीं असतील तर त्याला जास्त जमीन मिळेल. एखाद्याच्या शेतांत कमी पिकलें असेल तर सगळे जण आपल्यांतलें त्याला थोडें थोडें देतील. एखाद्याच्या शेतांत जास्त काम निघालें तर सगळे मिळून त्याच्या शेतांत फुकट काम करतील. सगळे गांवाच्या सुखानें सुखी, आणि गांवाच्या दुःखानें दुःखी होतील. आज कुणी म्हणतो 'माझी ६० एकर जमीन.' कुणी म्हणतो 'माझी ३० एकर जमीन.' कुणी म्हणतो 'माझी ५ एकर जमीन.' आणि कुणी म्हणतो 'मला जमीन च नाहीं.' ग्रामदानानंतर प्रत्येकजण म्हणेल 'आमची ३०० एकर जमीन आहे.' सारें गांव एक कुटुंब बनलें तर गांवची सर्व जमीन सर्वांची होईल.

असें झालें तर किती आनंद होईल! लोक मला एकेक गांव दान देत आहेत. मी म्हणतों तालुकाचा तालुका कां देत नाहीं? तुम्ही इतरांना विचार समजावून सांगत नाहीं म्हणून असें होतें. बाबांनो! हें सगळें तुमच्या भल्याचें काम आहे. बाबाच्या नांवानें तुम्ही ग्रामदान करतां. परंतु बाबा आज तुमच्या गांवांत आहे. आणि उद्यां दुसऱ्या गांवीं निघून जाईल. तो काय तुमची जमीन थोडी च बरोबर नेणार आहे? ती गांवांत च राहणार आहे. परंतु सगळ्या गांवची ती होईल. ज्या गांवांत एकीकडे भूमिमालक आणि दुसरीकडे भूमिहीन आहेत तें गांव कधीं च पुढें जाणार नाहीं.

■ ■ ■

## मी पूर्णविराम नसून प्रश्नचिह्न आहें : १९ :

"ओरिसा आणि तामिलनाड यांच्या परिस्थितींत पुष्कळ फरक आहे. ओरिसा आदिवासींचा अशिक्षित भाग असल्यामुळें तिथें ग्रामदान सोपें वाटलें तरी तामिलनाडमधें तें तितकें सोपें नाहीं," असें अनेकांना वाटत होतें. परंतु तशी धास्ती मला मुळीं च वाटत नव्हती. उलट मीं हें च मानलें होतें कीं तमीळ भाषेंत जरी मी लोकांशीं बोलूं शकलों नाहीं तरी हें काम तिथें हि पुष्कळ च चांगलें होणार आहे. हें कशामुळें वाटत होतें ? तामिलनाड संतांची भूमि आहे हें मला माहीत होतें म्हणून. तसें पाहिलें तर तेथें हि संपत्ति आणि जमीन यांबद्दलचा लोभ आणि वासना आहे च. असें असून ग्रामदानाचा विचार येथें पसरला याचें कारण येथील सत्पुरुषांच्या आशीर्वादाचें बळ हें च आहे. मदुरा जिल्ह्यांत तर मला बायबलच्या वाक्याची आठवण झाली (पीक भरपूर आहे. कापणी करणारे कमी आहेत.) तथापि येथें हि कापणीला थोडे मजूर लाभले आणि त्यांनीं मोठ्या प्रेमानें आणि तन्मयतेनें काम केलें. आतां ग्रामदानांमधून ग्रामोदयाचें दर्शन व्हावें यासाठीं 'सर्वोदय-मंडळा' ची आपण स्थापना केली आहे. तथापि तें मंडळ केवळ मार्गदर्शक राहील.

परंतु मला मुख्य गोष्ट वेगळी च सांगायची आहे. सर्वोदयाची स्थापना किंवा ग्रामराज्याची स्थापना करण्याच्या कामाचें ओझें आपल्या डोक्यावर राहूं द्यायचें नसेल तर व्यापक प्रमाणावर ग्रामदानें झालीं पाहिजेत. म्हणजे मग हें सर्व काम सरकार उचलून घेईल. फक्त कांहीं हजार ग्रामदानें झालीं तर कांहीं गांवांत सर-कारचे लोक बसतील, कांहीं गांवांत काँग्रेसचे लोक बसतील आणि

कांहीं गांवांत सर्वोदयवाले बसतील. पण जेव्हां लाखो ग्रामदानें मिळतील तेव्हां सरकार, कांग्रेस, सर्वोदयवाले असा भेद च राहणार नाहीं. कारण सर्वांना हवी असलेली वस्तु च सिद्ध झालेली असणार. सर्वोदय सर्वांना च हवा आहे. लाखो ग्रामदानें झालीं तर हें काम या मार्गानें होऊं शकतें असा विश्वास दृढ होईल. त्या-वेळीं ग्रामराज्याचा फारसा भार आपल्यावर राहणार नाहीं. आपण एक दोन नमुने दाखवून दिल्यानें आपलें काम होऊन जाईल. परंतु ग्रामदानाचा हा झरा जर खंडित झाला आणि कांहीं हजार ग्रामदानें घेऊन आपण स्वस्थ बसलों तर फार च मोठा भार आपल्या शिरावर राहील. जीं थोडीं ग्रामदानें आपल्याला मिळतील त्यांत नमुनेदार रचना करण्यांत आपल्याला यश आलें नाहीं तर सारें आंदोलन च अयशस्वी होण्याची धास्ती आहे. परंतु लाखो ग्रामदानांनंतर रचना करण्याचें काम सरकार हातीं घेऊं शकेल. ग्रामदान ही वस्तु सद्भावानें, हृदयपरिवर्तनानें सिद्ध होते. परंतु ग्रामराज्य यशस्वी करून दाखविणें हें अकलेचें काम आहे. आमची अक्कल मर्यादित असली तर तें काम हि मर्यादित च राहील. परंतु सर्वत्र ग्रामदानें मिळूं लागल्यावर सगळीकडचे लोक आपली अक्कल चालवून ग्रामराज्य यशस्वी करण्याचा प्रयत्न करतील. इतर लोकांची अक्कल आमच्यापेक्षां अधिक असण्याची शक्यता आहे. तसें झालें म्हणजे प्रयोग व्यापक होतील, त्यांचें एक शास्त्र बनेल, अनेकांची अक्कल एखाद्या कामीं लागली म्हणजे शास्त्र तयार होतें. म्हणून ग्रामदानांचा झरा खंडित होऊं न देतां लाखो गांवांचें ग्रामदान झालें पाहिजे. मग आपण सरकारला सवाल करूं शकूं कीं "इतकीं गांवें पूर्ण मिळालीं असून तुम्ही स्वस्थ कसें

बसलांत ? ग्रामदानांत मिळालेल्या गांवांतून सर्वोदयाचें काम करण्याची जबाबदारी एकटया सर्वोदयवाल्यांची च आहे का ?"

आमचें काम समस्या सोडवीत बसण्याचें नसून नवीन नवीन समस्या निर्माण करण्याचें आहे. लाखो ग्रामदानें प्राप्त करून आम्ही सरकार, काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्या समोर एक मोठें प्रश्न-चिह्न निर्माण करूं इच्छितों. आम्ही प्रश्न उत्पन्न करीत जाऊं आणि ईश्वराच्या मदतीनें जग ते प्रश्न सोडवीत जाईल. सर्वोदयाचा विचार ही विनोबाच्या बापाची इस्टेट नाहीं. कांहीं गांवांत नमूना उभा करणें हें माझें काम असलें तरी ग्रामदानें मिळवीत जाऊन देशापुढें प्रश्नचिह्न उभें करणें हें माझें मुख्य काम आहे. मी पूर्ण-विराम नसून प्रश्नचिह्न आहें.

■ ■ ■

## अकिली ग्रामदानाचें फेरवाटप : २० :

(ओरिसांतील अकिली नांवाचें गांव ग्रामदानांत मिळालें. त्या गांवाची जमीन विनोबांच्या हस्ते पुनर्वितरित झाली. त्यावेळीं विनोबा म्हणाले :)

"आज तुम्हीं जें काम केलें त्यानें भगवंताला परम संतोष वाटला आहे. भगवंताचा तुम्हांला आशीर्वाद आहे असें समजा. आज तुम्हीं मंडळींनीं एक मोठें प्रेम-कार्य केलें आहे. ही घटना पाहून हि ज्याची ईश्वरावर श्रद्धा बसणार नाहीं तो करंटा च म्हटला पाहिजे.

एखाद्या खेडयांतील लोकांनीं साऱ्या गांवाची जमीन दान देऊन टाकल्याची भारतांतील ही घटना साऱ्या जगाच्या इतिहासांत

अद्‌भुत समजली जाईल. आजपर्यंत अशी घटना कोणाच्या ऐकिवांत नाहीं. या कार्यांत कोणाची कोणावर जबरदस्ती नाहीं कीं दबाव नाहीं. अशीं कामें जबरदस्तीनें होत नसतात. माझ्या हस्ते सबंध गांवाची जमीन वाटली गेल्याचें हें पहिलें च उदाहरण आहे. आतां-पर्यंत अशीं पूर्ण गांवें १०० मिळालीं आहेत. अगदीं पहिलें ग्रामदान उत्तर प्रदेशांतील मंगरौठचें. तें गांव आतां हिंदुस्थानभर प्रसिद्ध झालें आहे. तें गांव मीं अजून पाहिलें नाहीं. त्या गांवापासून एक मैलाच्या अंतरावरून माझी पदयात्रा झाली होती. त्या गांवच्या लोकांनीं रस्त्यांत माझें स्वागत करून मला ही आनंदाची बातमी सांगितली होती. त्यानंतर तुमच्या या प्रांतांत मिळालेलें पहिलें ग्रामदान मानपूरचें. त्या गांवीं मला जाण्याचा सुयोग आला होता. परंतु त्या गांवाची जमीन मी जाण्याच्या आधीं च पुनर्वितरित झाली होती. म्हणून सर्वस्वदान झालेल्या गांवाचें फेरवाटप माझ्या हस्ते होणारें हें पहिलें च गांव आहे.

आपले वृद्ध पुढारी राजाजी म्हणाले होते कीं “भूदान-यज्ञ हा ईश्वरावर श्रद्धा दृढ करणारा यज्ञ आहे” आज या गांवांत मला ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन होत आहे. ज्याचें कल्याण ईश्वराला करायचें असतें त्याला तो सद्‌वासना देतो. तो च सद्‌वासना देतो, प्रेरणा देतो, आणि सत्कर्म करवितो. हें कार्य तुम्हीं किंवा मीं केलें असें मला वाटत नाहीं. हें कार्य ईश्वरानें च घडवून आणलें आहे असें मला वाटतें.

आतां तुम्ही गांवचे लोक एका कुटुंबासारखे रहा. कोणी खोटें बोलूं नका, एकमेकांशीं भांडूं नका, सारे स्वच्छ रहा, आळस सोडा, व्यसनें सोडा, एकमेकांना मदत करा आणि सारे मिळून

ईश्वराचें नांव घ्या. आमच्या म्हणण्याप्रमाणें तुम्हीं मंडळींनीं एवढें मोठें काम केलें त्यामुळें आमची जबाबदारी वाढली आहे. तुम्हांला जरूर ती मदत करण्यास आम्ही तयार असलों तरी आम्ही तुम्हांला परावलंबी करूं इच्छित नाहीं. तुम्ही बलवान होऊन आपल्या बळावर प्रगति करावी असें माझें म्हणणें आहे. आम्ही प्रसंगीं सल्ला देऊं. कांहीं मदत हि करूं. परंतु तुम्हांला आतां आपल्या गांवांत उद्योग वाढविले पाहिजेत, गांवचें कापड गांवांत काढलें पाहिजे. गांवचे झगडे गांवांत च मिटविले पाहिजेत. त्याशिवाय ग्रामराज्य व्हायचें नाहीं.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११५०८

: २१ :

# प्रतिज्ञा

(समुद्राच्या तीरावर आणि तें हि भारताच्या थेट दक्षिण टोंकावर पोंचल्यानंतर विनोबांचें चिंतनशील चित्त उचंबळून आल्या-शिवाय कसें राहणार ? आणि विनोबांचा विशेष हा कीं ज्या ज्या वेळीं चित्तावर विशेष परिणाम करणारी एखादी घटना घडते त्या त्या वेळीं ते एखादा नवीन संकल्प किंवा नवीन प्रतिज्ञा करीत असतात. गेल्या सहा वर्षांपासून सूर्याप्रमाणें त्यांची अखंड परिव्रज्या चालू असतांना आणखी कोणत्या तपस्येच्या संकल्पाची अपेक्षा करायची ? परंतु भूमिदान सहाव्या हिश्श्यापासून सुरू होऊन आतां केवळ ग्रामदानापर्यंत च नव्हे तर समग्र प्रदेश-दानापर्यंत येऊन ठेपलें आहे. एक सबंध गांव जेव्हां ग्रामदानांत मिळालें तेव्हां च विनोबांच्या क्रांत बुद्धीला कळून चुकलें कीं असंख्य ग्रामदानें जरूर मिळूं शकतील. आणि असंख्य ग्रामदानें मिळूं शकल्यावर प्रदेशदान कां असंभव वाटावें ? म्हणजे शेंवटीं सबंध भारत-दानापर्यंत हा विचार जाऊन पोंचतों.

हें ग्रामदान कशासाठीं ? तर ग्रामराज्याची कल्पना साकार व्हावी या साठीं. या ग्रामराज्य-स्थापनेची प्रतिज्ञा घेण्याची प्रेरणा विनोबांना कन्याकुमारीच्या वाळवंटांत झाली. पहांटे च विनोबा समुद्रावर फिरायला निघाले. दूर वाळूंत न बसतां लाटांनीं न्हाऊन

निघणाऱ्या एका खडकावर ते जाऊन बसले. बरोबरची मंडळी हि त्यांच्या आसपास होती. कोणी च कांहीं बोलत नव्हतें. महासागराच्या तरंगांचा गंभीर ओंकार-ध्वनि तेवढा वातावरणांत पसरला होता. पूर्वेकडे सूर्योदय होऊं लागला होता. सूर्योदयानंतर विनोबा धीर-गंभीर वाणीनें उद्गारले— )

"आज कन्याकुमारीच्या चरणापाशीं, हिंदी महासागराच्या तीरावर, आणि भगवान् सूर्यनारायणासमोर, मी अशी प्रतिज्ञा करतों कीं भारतामधें जोंपर्यंत ग्रामराज्याची स्थापना होत नाहीं तोंपर्यंत त्याच्या सिद्धीसाठीं सतत परिभ्रमण चालू ठेवून प्रयत्न करीत राहीन. हें कार्य सिद्धीस नेण्याचें बळ ईश्वर देवो अशी त्याच्या चरणीं मी प्रार्थना करतों."

या उच्चारणानंतर एक लाट विनोबांच्या अंगावर तुषार उडवून गेली, दुसरी त्यांच्या चरणांना चाटून गेली, आणि तिसरीनें त्यांना अभ्यंगस्नान घालून जणू प्रतिज्ञापूर्तीचा आशीर्वाद च दिला.

■ ■ ■

## ग्राम-दानी मंडळींशीं चर्चा : २२ :

[ एका ग्रामदान झालेल्या गांवची कांहीं प्रमुख मंडळी विनोबांना भेटायला आली होती. त्यांच्याशीं पुढील प्रमाणें संवाद झाला. ]

विनोबा:–– तुम्हीं कोणत्या विचारानें ग्रामदान केलें आहे ?

प्रतिनिधि:–– आमच्या गांवांतील गरीब लोकांना पोटभर जेवण मिळत नाहीं. आम्हीं विचार केला कीं आपल्याजवळ असलेलें सर्वांनीं वाटून खावें. ग्रामदानामुळें आतां तसें करण्याची संधि मिळाली आहे.

वि.:–– ग्रामदान हा पाया आहे. त्यावर ग्रामराज्याची इमारत उभी करायची आहे. आपलें कापड, तेल, इत्यादि नित्योपयोगी वस्तु आपल्या गांवांत च तयार करायच्या असें तुम्हीं ठरविलें आहे काय ?

प्रतिनिधि:–– होय. तसें ठरविलें आहे. आणि त्याप्रमाणें आम्ही करणार आहोंत.

वि.:–– फार छान. एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं या गांवांत आतां ईश्वराशिवाय कोणा हि एका व्यक्तीची मालकी उरली नाहीं.

प्रतिनिधि:––आतां आम्ही गांवच्या जमिनीची वाटणी कशी करायची ?

वि.:–– गांवची सगळी मंडळी मिळून जें ठरवितील तसें होईल. गांव लहान असेल तर सगळ्या गांवचें मिळून एक च शेत होऊं शकेल. वयलूर गांवांत केलें त्याप्रमाणें चार भाग हि करतां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... दि:

येतील. किंवा प्रत्येक घराला थोडी थोडी जमीन वाटून देतां येईल. तुम्हां मंडळींना वाटेल त्याप्रमाणें प्रयोग करूं शकतां.

प्रति.:— आमच्यापुढें कर्जाचा फार मोठा प्रश्न आहे.

वि.:— आतां कर्ज व्यक्तिगत राहणार नाहीं. सारें गांवचें कर्ज होईल. आतांपर्यंत जें कर्ज घेतलें गेलें असेल त्याबद्दल सावकारांना सांगू कीं "बाबांनो, आतांपर्यंत तुम्हांला व्याजाच्या रूपानें किती रकम मिळाली ती पहा. कांहीं रकम येणें राहिली असेल तर ती संपत्तिदान समजून सोडून द्याल तर चांगलें होईल." ग्रामदान करून तुम्हीं मंडळींनीं प्रेम प्रकट केलें आहे. सावकाराशीं प्रेमानें बोलल्यास कदाचित् ते हि प्रेमानें कांहीं सोडून देण्यास तयार होतील. जें काय थोडें कर्ज राहील तें त्यांच्याशीं बोलून दर वर्षीं पिकाचा एक हिस्सा ठरवून हप्ते-बंदीनें फेडतां येईल. कांहीं मदत बाहेरून संपत्तिदानाच्या रूपांत आणि कांहीं सरकारकडून हि मिळवितां येईल. परंतु यापुढें जर कर्जाची जरूर पडली तर तें मात्र सगळ्या गांवातर्फे काढलें जाईल, व्यक्तिगत काढतां येणार नाहीं.

प्रति.:—मुला-मुलींच्या लग्नाची देखील आम्हांला चिंता असते.

वि.:— यापुढें लग्नें साऱ्या गांवातर्फे होतील. बाहेरच्या गांवचीं मंडळी तुमच्या गांवांत आपल्या मुली पाठविण्यास विशेष उत्सुक होतील. कारण तुमचें गांव आतां एक मोठें कुटुंब झालें आहे असें त्यांना वाटेल. आपल्या मुलीला या गांवांत कशाची वाण राहणार नाहीं असा ते विचार करतील. कुटुंब मोठें बनल्यामुळें तुम्ही श्रीमंत बनलांत. कांहीं थोड्या गांवांत ग्रामदानें झालीं

असल्यामुळें अशासारखे प्रश्न उत्पन्न होतात. परंतु पांच लाख गांवांतून जेव्हां ग्रामदान होईल तेव्हां लग्नें आणि कर्ज यांसारखे प्रश्न च उरणार नाहींत. त्यावेळीं सावकारांचें हि हृदयपरिवर्तन होईल आणि सगळें कर्ज सोडून देण्यास ते तयार होतील. जिथें व्यक्तिगत मालकी च राहिली नाहीं तिथें कर्ज तरी कसें राहणार? सूर्योदय झाल्यावर अंधाराचें काय करायचें हा प्रश्न राहतो का?

प्रति.:— ग्रामदान झाल्यानंतर शेजारच्या गांवचे कांहीं लोक आमच्या शेतांतील पीक चोरायला आले होते.

वि.:— मग तुम्हीं काय केलें?

प्रति.:— आम्हीं त्यांना पकडून त्यांच्याजवळचें धान्य काढून घेतलें आणि त्यांना सोडून दिलें. आमच्या येथें ग्रामदान झालें असल्यामुळें आम्हीं त्यांच्यावर कोर्टामधें फिर्याद केली नाहीं.

वि.:— चांगलें केलें. तुम्हीं आतां वेगवेगळे न राहतां एक झालां आहांत त्यामुळें चोरांची भीति वाढेल कीं कमी होईल?

प्रति.:— कमी होईल.

वि.:— परंतु आतां असें करा. गांवांत जर कोणी रात्रीं डाका घालायला आला तर त्याला पकडून सांगा 'अरे बाबा, तूं गरीब दिसतोस म्हणून चोरी करायला आलास. तुला जर कांहीं लागलें तर यापुढें तुला रात्रीं यायची गरज नाहीं. दिवसां येत जा. आम्ही तुला काम देऊं आणि खायला देऊं.

प्रति.:— तसें केलें तर आसपासच्या गांवांतून किती तरी माणसें आमच्या गांवांत येऊं लागतील.

वि.:–– येऊं द्या ना ? त्या मंडळींना घेऊन तुम्ही त्यांच्या गांवीं जा, आणि तेथल्या जमीन-मालकांना प्रेमानें सांगा "तुमच्या गांवची दुःखी कष्टी माणसें आमच्या गांवांत येतात. तुम्ही देखील आमच्यासारखें ग्रामदान कां करीत नाहीं ?" असें केलें म्हणजे ग्रामदानाचा खूप प्रचार होईल. देवानें काय एकटचा तुम्हांला च अक्कल दिली आहे ? त्यांना नाहीं दिली ? ते ग्रामदान कां करणार नाहींत ?

प्रति.:–– आमच्या गांवांत दोघे तिघे ग्रामदानाला तयार नाहींत त्यांचें काय करायचें ?

वि.:––त्यांच्यावर खूप प्रेम करा. त्यांना सांगा कीं "तुम्ही वेगळे राहूं इच्छितां तर कांहीं हरकत नाहीं. तुमचें आम्ही पूर्ण रक्षण करूं. तुमची जमीन सोडून बाकीची जमीन आम्ही आमच्यांत वाटून घेऊं. तुम्ही तुमच्या शेतांत कामाला बोलवाल तेव्हां मोठ्या प्रेमानें येऊं." आज जमीन-मालकाच्या शेतांत काम करणारा मजूर मनापासून काम करीत नाहीं. परंतु ग्रामदानानंतर त्या माल-काला कळून येईल कीं आपल्या शेताचें उत्पन्न वाढलें आहे, लोक प्रामाणिकपणें आणि प्रेमानें काम करूं लागले आहेत. अशा स्थितींत आपण हि त्यांच्यांत कां सामील होऊं नये ? असें त्याला वाटूं लागेल. आपल्या गांवांतील भूमिहीनांवर तुम्हीं जसें प्रेम केलें तसें च या जमीन न देणारावर प्रेम कराल तर तुम्ही त्याला जिंकाल. आपण सामील न झालों तर गांववाले आपल्यावर बहि-ष्कार टाकतील आणि आपल्या शेतावर कोणी कामाला येणार नाहीं ही शक्यता असतांना हि हे लोक प्रेमानें आपल्या शेतांत

कामाला येतात हें पाहिल्यावर त्याच्या सहज लक्षांत येऊन जाईल कीं आतां इतरांच्या कल्याणात च आपलें हि कल्याण आहे."

शेंवटीं विनोबा म्हणाले, "तुम्हीं ग्रामदान देऊन जें प्रेम व्यक्त केलें आहे तें सतत वृद्धिगत करा. आसपासच्या गांवांना जेव्हां दिसेल कीं या गांवचे लोक मिळून मिसळून काम करतात, आणि नीतीनें वागतात तेव्हां ते हि तुमच्या मागोमाग येतील. कोरापुट जिल्हयांत काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याचें नुकतें च मला पत्र आलें आहे. त्यांत तो म्हणतो कीं अनेक गांवचे लोक आनंदानें स्वत: होऊन भूदान कार्यालयांत ग्रामदान देऊन जात आहेत. भलेपणाची हवा वेगानें पसरत असते. म्हणून रोज संध्याकाळीं देवाचें भजन करा म्हणजे तो तुम्हांला सद्बुद्धि देईल. देवाजवळ विपुल पडलें आहे. तुम्ही मागत जा, तो देत च जाईल. आतां ग्रामदानांमुळें तामिलनाडची हवा च बदलून गेली आहे. देण्याची हवा सुरू झाली कीं दारिद्र्य संपलें च समजा.

■ ■ ■

## ग्रामदान प्रश्नोत्तरी (१) : २३ :

प्र.:—भूमिहीनांना जमीन देणें आणि ग्रामदान यांत काय फरक आहे ?

वि.:—गांवांतील सर्व भूमिहीनांना जर जमीन मिळाली तर ग्रामदान आणि भूमिहीनांमधें जमिनीचें वाटप यांत बाह्यत: खास फरक राहणार नाहीं. तथापि ग्रामदान हें त्या वाटपापेक्षां श्रेष्ठ आहे. कारण ग्रामदानांत सर्व जमीन गांवच्या मालकीची होते. व्यक्तिगत मालकी संपते. जमीन अलग अलग कुटुंबांत

वाटून द्यायची कीं सामुहिक पद्धतीनें कसायची हें गांववाल्यांनीं ठरवायचें आहे. ग्रामदानांत वाटपाची समस्या च राहत नाहीं. गांव एक कुटुंब बनतें, आणि ग्राम-विकासाची मोठी सोय होते.

प्र.:—ग्रामदान झालेल्या गांवांत असलेली आपली जमीन ज्यानें दान दिली त्याची ग्रामदान न झालेल्या दुसऱ्या गांवांत हि जमीन असेल तर तो मनुष्य ग्रामसभेचा सदस्य बनूं शकतो का ?

वि.:—ग्रामदान झालेल्या गांवांतील सारी जमीन त्यानें दिली असेल तर त्या गांवच्या ग्रामसभेचा तो सदस्य बनूं शकतो. दोन तीन गांवांत त्याची जमीन असेल आणि त्या गांवांचें ग्राम-दान झालें असेल तर त्या त्या गांवांच्या ग्रामसभेचा देखील तो सदस्य बनूं शकतो. परंतु आपण त्याला शिफारस करूं कीं तो जर एका च गांवांत राहतो तर इतर गांवांचें सदस्यत्व स्वेच्छेनें त्यानें सोडावें हें चांगलें. कारण इतक्या गांवांच्या सभांना एक च व्यक्ति नेहमीं हजर राहणें हि कठिण च आहे. त्यानें तर इतर गांवांत त्याला मिळणाऱ्या वाटचाचा हि हक्क सोडला तर चांगलें होईल. पण तसा हक्क तो राखूं इच्छित असेल तर त्या गांवानें तो त्याला द्यावा.

प्र.:—ग्रामदानी गांवांत राहणारी व्यक्ति गांवाबाहेर नोकरी करीत असेल तर तें वेतन त्यानें गांवाला दिलें पाहिजे का ?

वि.:—अशा गोष्टी आपसांत प्रेमानें सोडवायच्या आहेत. त्याला जर नोकरी असेल तर तो ग्रामदानांतील जमिनीचा वांटा मागेल च कशाला ? वेतन कमी पडत असेल तर तो जमीन मागूं शकेल. परंतु इतरांपेक्षां कमी च मागेल.

मुख्य मुद्दा असा कीं सर्वांनीं गांवाच्या उन्नतीच्या दृष्टीनें विचार करायला हवा. प्रत्येकजण आपल्यापुरता च विचार करूं लागला तर ग्रामदानाचा विचार च खंडित झाला असें समजावें. ग्रामदानाचा विचार मातृ-भावनेवर उभा आहे.

प्र.:—ग्रामदानी गांवांत ज्यानें आपली जमीन दान दिली नाहीं त्याची जमीन गांववाले भाड्यानें करूं शकतील का? आणि अमुक एक हिस्सा मालकाला दिला च पाहिजे असें कायदेशीर बंधन राहील का?

वि.:—शंभर जमीनदारांपैकीं दोन जमीनदारांनीं आपली जमीन दान दिली नाहीं असें समजा. ही सर्व जमीन ते लोक स्वतः कसत नसून मजुरांमार्फत कसत होते असें समजा. कारण स्वतः कसत असते तर ग्रामदानांत सामील च झाले असते. परंतु ते सामील होत नाहींत याचा अर्थ त्यांना स्वतः जमीन कसायची नाहीं किंवा आपली जास्त जमीन सोडायची नाहीं. ही जमीन आतां गांवांतील लोक स्वतंत्रपणें कसणार नाहींत. ग्रामसभा त्या जमीनमालकाशीं त्याबाबत ठराव करील. आणि त्याची जमीन ते कसण्यास घेतील आणि त्याला योग्य तो मोबदला देतील. पूर्वींच्या मजुरांपेक्षां ग्रामसभा अधिक प्रामाणिकपणानें शेती करते असें त्याला दिसल्यावर कालांतरानें तो ग्रामदानांत सामील होईल. कारण गांवाचें ज्यांत हित आहे त्यांत च आपलें हित आहे हें त्याला कळून येईल.

प्र.:—एकदां ग्रामदान झाल्यानंतर मागाहून कांहीं लोकांना त्यांतून अलग व्हायचें असेल तर होतां येईल कीं नाहीं?

वि.:—हा प्रश्न च कसा उत्पन्न होतो ? ग्रामदान समजून उमजून प्रेमानें आणि खुषीनें झालें असेल तर वेगळें होण्याची कोणाला इच्छा कां होईल ? ग्रामदान झालेल्या गांवांच्या बाबतींत कायदेशीर व्यवस्था हि बदलेल. त्यामुळें मागाहून कोणाला वेगळें व्हायची इच्छा झाली तर तें शक्य होणार नाहीं.

प्र.:—ग्रामदानी गांवांत व्यक्तिगत कर्जाबाबत काय व्यवस्था राहील ?

वि.:—गांवच्या लोकांनीं आपली जमीन आणि संपत्ति सर्वच्या सर्व गांवाला अर्पण केली असेल तर सर्व कर्जें गांवची सामूहिक बनतील. नवीन कर्ज कोणा हि व्यक्तीला काढतां येणार नाहीं. जरूर च पडली तर असें कर्ज ग्रामसभा सामुहिक च काढील.

■ ■ ■

## ग्रामदान-प्रश्नोत्तरी (२) : २४ :

प्र.—केरळमधें हल्लीं जीं ग्रामदानें मिळत आहेत त्यांना खऱ्या अर्थानें ग्रामदान म्हणतां येईल का ? कांहीं गांवांत फक्त हरिजन एकत्र येतात, इतर येत नाहींत; कांहीं गांवांत फक्त भूमिहीन एकत्र येतात; तर कांहीं गांवांत लहान जमीनदार आणि भूमिहीन एकत्र येतात, पण मोठे जमीनदार अलग च राहतात.

वि.—ओरिसामधें हि असे च प्रश्न मला विचारण्यांत येत असत. या प्रश्नाचें मुख्य स्वरूप समजून घ्या. आंब्याच्या झाडाला कैऱ्या लागल्या तरी 'आंबे लागले' असें आपण म्हणतों. त्या कैऱ्या

पिकल्या तरी त्यांना आपण 'आंबे' च म्हणतों. आंब्याच्या प्राथमिक आणि अंतिम अवस्थांच्या दरम्यान हि तो आंबा च म्हटला जातो. एक आकार आला कीं नांव देण्यांत येतें. साडी विणण्यास सुरवात झाली आहे परंतु पूर्ण विणून व्हायची आहे असें समजा. तुम्हीं जर विणकराला विचारलें कीं "तूं काय विणतोस ?" तर तो उत्तर देईल "साडी विणतों." गहूं दळले जातात पण आपण म्हणतों कीं "पीठ दळतों आहोंत." कारण दळण्यांतून शेंवटीं पीठ पडत असतें. याला च संस्कृतांत "भविष्यत् वृत्ति" म्हणतात. योगाची साधना करणारा हि 'योगी' आणि साधना पूर्ण झालेला हि 'योगी' च म्हटला जातो. तसें संपूर्ण ग्रामदानापूर्वीं गांवांतील कांहीं वर्गांनीं स्वामित्व सोडलें तरी तें ग्रामदान, आणि गांवांतील एकूण एक लोकांनीं स्वामित्व सोडलें तरी तें ग्रामदान च. पहिला प्रकार ग्रामदानाची सुरवात, दुसरा प्रकार ग्रामदानाची पूर्णता.

परंतु ग्रामदानाचा वास्तविक अर्थ काय तें नीट समजून घ्या. एका गांवांत १०० लोकांजवळ जमीन आहे आणि ५० लोकांजवळ जमीन नाहीं असें समजा. आतां साऱ्या जमीन-मालकांनीं जरी आपली मालकी सोडली आणि भूमिहीनांनीं गांवांसाठीं कांहीं च दिलें नाहीं तर तें पूर्ण अर्थानें ग्रामदान झालें असें म्हणतां येणार नाहीं. गांवांतील प्रत्येकानें आपल्यापाशीं जें काय आहे तें गांवाला समर्पण करणें याला ग्रामदान म्हणतात. भूमिवानांनीं भूमि द्यावी, श्रमवानांनीं श्रम द्यावे, बुद्धिमानांनीं बुद्धि द्यावी अशा रीतीनें प्रत्येकानें गांवाला आपली शक्ति दिली पाहिजे. भूमिहीन लोक भूमिहीन असले तरी श्रमवान आहेत. आणि भूमिवान लोक भूमिवान असले तरी श्रमहीन आहेत.

पुष्कळांना वाटतें कीं ग्रामदान म्हणजे भूमिवानांनीं जमीन देणें आणि भूमिहीनांनीं जमीन घेणें. परंतु ही अत्यंत चुकीची कल्पना आहे. परमेश्वरानें प्रत्येकाला दोन हात दिले आहेत. एक हात आहे घेण्यासाठीं तर दुसरा हात आहे देण्यासाठीं. ज्याच्या-जवळ द्यायला कांहीं च नाहीं असा अभागी प्राणी देवानें एक हि जन्माला घातला नाहीं. ग्रामदानाची चळवळ म्हणजे प्रत्येकानें ग्रामसमाजाला "देण्याची" चळवळ.

गांवांतील भूमिहीन किंवा गरीब लोक हे दयापात्र नसून गांवाचे समान आणि सन्माननीय नागरिक आहेत ही गोष्ट ग्राम-दानानें सिद्ध करायची आहे. नदीच्या उगमाजवळ थेंब थेंब पाणी पडत असलें तरी त्या थेंबांत नदी बनविण्याची शक्ति आहे. नाल्यांत पाण्याचा वेग दिसला तरी शेंवटीं तो नाला च आहे. भूदानाची हि आपल्यापरी स्वतंत्र किंमत असली तरी ग्रामदानाची सर भूदानाला नाहीं. ग्रामदानानें पाहतां पाहतां आध्यात्मिक क्रांति होणार आहे.

**प्र.**––कांहीं गांवांतील मोठे जमीनदार ग्रामदानांत सामील तर होत च नाहींत, पण ज्यांनीं दान दिलें त्यांना फोडण्याचा प्रयत्न करतात. याबाबत काय करावें ?

**वि.**––व्यक्तिगत मालकीला आज कायद्याचा पाठिंबा आहे. परंतु आपलें आंदोलन खुषीनें आणि प्रेमानें स्वामित्व सोडण्याचें आंदोलन आहे. मोठे जमीनदार स्वामित्व सोडतील तेव्हां लहान जमीनदार सोडायला तयार होतील असें पुष्कळांना वाटतें. पण तें चूक आहे. मोठ्या जमीनदारांची मालकी छोट्या जमीनदारांनीं च मजबूत केलेली असते. लहान जमीनदारांनीं आपापलें स्वामित्व सोडलें

कीं त्याचा नैतिक परिणाम मोठ्या जमीनदारांवर झाल्याशिवाय रहायचा नाहीं. आणि त्यांनीं स्वामित्व न सोडलें तर स्वामित्व च त्यांना सोडून जाईल ! त्यांचें स्वामित्व राहणें च शक्य नाहीं. कारण आज त्यांची जमीन मजूर च कसताहेत. ग्रामदान झाल्या-वर मजूर स्वतंत्रपणें जमीन कसणार नाहींत. अशा स्थितींत ते काय करतील ? श्रीमंतांची श्रीमंती समाजाच्या सहकाराशिवाय टिकूं शकत नाहीं. म्हणून आज जरी ते सामील न झाले तरी काळाची हवा ओळखून पुढें मागें ते सामील झाल्याशिवाय रहा-यचे नाहींत.

आम्हीं मात्र सामील न होणारांविषयीं धीर आणि प्रेम राखून वागलें पाहिजे. जो आज सामील होत नाहीं तो उद्यां होणार आहे. पेरणीच्या दिवसांत कुणी आज पेरतो तर कुणी दुसऱ्या दिवशीं पेरतो. पण पेरल्याशिवाय कोणी च राहत नाहीं. सावकार वगैरे लोक छोटया जमीनदारांना भडकवून देतील तर त्याला हि आपण तोंड दिलें पाहिजे. कोरापुटमधें अशीं उदाहरणें झालीं आहेत. मी गांववाल्यांना सांगत असतों "तुम्ही भिऊं नका. हा सारा खुषीचा मामला आहे. तुम्हांला ग्रामदान परत घ्यायचें असेल तर घेऊं शकतां. मला त्याची फिकीर नाहीं. मी विचार-प्रचार करीत राहणार आहें. सूर्यासमोर अंधार टिकत नाहीं त्या-प्रमाणें ग्रामदानाच्या सत्य विचारासमोर विरोध टिकायचा नाहीं. हें सत्य आज ना उद्यां देशाला कबूल करावें च लागणार आहे. जागतिक युद्ध झालें तर तुमची पंचवर्षीय योजना तुटून पडेल पण ग्रामदान टिकाव धरून राहील.

■ ■ ■

## सेवा-सेना आणि शांति-सेना : २५ :

आजारपणांत मनुष्याची चिंतनशक्ति दुर्बल होते असें सामान्यत: मानलें जातें. परंतु मला उलटा च अनुभव आला. या महिन्यांत मी खूप च आजारी झालों. शरीराबद्दलचा भरंवसा पूर्वींपासून च मानलेला नव्हता, पण आतां ती जाणीव विशेष होत आहे. तथापि चिंतनाची शक्ति मीं बरी च अनुभवली.

या आजारपणांत जो मुख्य विचार सारखा मनांत घोळत राहिला तो शांति-सेनेबाबतचा होय. सरकार ही वस्तु नाहींशी झाली पाहिजे असें मी वारंवार सांगत आलों. तो जणूं मंत्र च बनला आहे. परंतु सरकार नष्ट व्हायचें म्हणजें काय, तें नीट समजून घेतलें पाहिजे. लोकांनीं स्वत:चें रक्षण स्वत: च करायला शिकलें पाहिजे. लोक-कार्यांत संरक्षण ही मोठी वस्तु असते. संरक्षण खातें नीट सांभाळलें गेलें नाहीं तर लोक अनाथ बनतील. म्हणून देशाची रक्षण-शक्ति प्रत्येक स्थानांत असली पाहिजे. या रक्षण-शक्तीला च मी शांति-सेना म्हणतों.

हिंसक सेना आणि शांति-सेना यांत पुष्कळ फरक आहे. कवायत, शिस्त इत्यदि बाबतींत या दोन सेनांचें साम्य असलें तरी मुख्य बाबतींत फार भिन्नता आहे. हिंसक सेना, ज्या ठिकाणीं तिचा मुळीं च परिचय नसतो अशा ठिकाणीं अधिक चांगल्या प्रकारें काम करूं शकते. कारण तिथें गोळी चालविण्याचा प्रश्न असतो. अशा वेळीं परिचय नसण्यानें कार्य चांगलें साधतें.

उलट अहिंसक म्हणजे च शांति-सेना परिचयाच्या क्षेत्रांत च अधिक चांगलें काम करूं शकते. ज्या माणसानें एखाद्या क्षेत्रांत

खोल सेवा केली असेल तो माणूस त्या ठिकाणचा उत्तम शांति-सैनिक बनूं शकतो. हिंदुस्थानचा एखादा माणूस उठेल आणि फ्रान्समधें शांति-सेनेचें काम करूं म्हणेल तर तें जमणार नाहीं. हां, एखादा व्यास भगवानासारखा नैतिक शक्तीचा पुरुष असेल तर गोष्ट वेगळी. एरवीं स्थानिक सेवक च स्थानिक क्षेत्रांत शांति-सेनेचें काम करूं शकतील.

शांति-सेनेचें काम निसर्गोपचारासारखें असतें. रोग होणार च नाहीं, या गोष्टीकडे प्राकृतिक चिकित्सा अधिक ध्यान देते. इतक्या ऊपर रोग झाला च तर शरीर-शुद्धीच्या द्वारें तो बरा करण्याचा प्रयत्न असतो. त्या प्रमाणें च अशांतता उत्पन्न च होणार नाहीं असा प्रयत्न करणें हें शांति-सेनेचें काम आहे. इतक्या ऊपर अशांति माजली तर त्या ठिकाणीं स्वतःचें बलिदान करणें हें शांति-सैनिकांचें कर्तव्य ठरतें. म्हणून शांति-सेनेचें नित्य-कार्य सेवा-सेनेच्या स्वरूपाचें राहील. आणि विशेष प्रसंगीं ती शांति-सेनेचें काम करील.

आळी-आळींतून आमचे सेवक ग्रामदान, साहित्य-प्रचार, सफाई, रुग्ण-सेवा इत्यादि विविध सेवेचें काम करतील. लोकांचा या सेवकांवर विश्वास असेल. अडचणीच्या वेळीं आपण बोलावलें तर हा मदतीला येईल अशी लोकांना खात्री वाटली पाहिजे. एखाद्या म्हातारीचा मुलगा आजारी असेल आणि तिनें या सेवकाला रात्रीं जागायला बोलावलें तर तो आनंदानें जाईल आणि रात्रभर जागून सेवा करील. असे सहृदय आणि सदा सर्वदा सेवेला तत्पर आपले शांति-सैनिक असतील. अशा सैनिकांचें ज्ञान वाढविण्यासाठीं मधून मधून रिफ्रेशर कोर्सेस घेतले

जावेत, सेवा-कार्य उत्तम प्रकारें कसें करतां येईल याचें ज्ञान अशा कोर्सेसमधून त्यांना मिळावें.

सर्व-पक्ष-मुक्त आणि सदा सेवेला तत्पर अशा सेवकांची ही कल्पना तशी नवीन नाहीं. कांहीं लोक पक्षापासून मुक्त असले तरी ते विशिष्ट सेवा करणारे असतात. परंतु हा सेवक सर्व प्रकारची सेवा करणारा असेल. गाढवावर कोणीं किती हि ओझें लादावें, तो तक्रार करणार नाहीं. तसा आमचा शांति-सैनिक असेल.

केरळमधें असे एक हजार सेवक तयार करायचे आहेत. त्यांच्यासाठीं शिक्षणाची योजना करावयाची आहे. त्यांच्या योग-क्षेमाची हि योजना करायची आहे. भूदान, ग्रामदान, हें काम तर ते करतील च, परंतु त्या पुढचें हि काम त्यांना करायचें आहे. हे सैनिक शहराशीं हि संबंध राखतील. सामान्यतः शहरांतून च अधिक दंगेधोपे होतात. आमची कल्पना, आमचे विचार, शहरां-तील लोकांपर्यंत पोंचत च नाहींत. ग्रामसेवक हा मुख्यतः गांवाची सेवा करील हें खरें असलें तरी त्याला शहराची उपेक्षा करून चालायचें नाहीं. शहरांतून संपत्तिदान आणि साहित्य-प्रचार हीं कामें विशेष होऊं शकतात. शहरांतील संपत्ति-दानाचा विनियोग थोडा शहरांत होईल च, परंतु अधिक खेड्यांत होईल. शहरांत सेवा करण्यासाठीं कॉलेजचे विद्यार्थी हि मिळू शकतात. गांवांतून सर्वोदय-मंडळें आणि शहरांतून मित्र-मंडळें स्थापन होतील. संपत्तिदाते, मित्र-मंडळें, आणि सर्वोदय-मंडळें, या तिघांनीं एकत्र येऊन काम केलें पाहिजे. मुख्य मुख्य शहरें आपल्या ताब्यांत असलीं

पाहिजेत. शांति-सेनेच्या सेवकांची सेवाशक्ति वाढेल आणि व्यापक होईल या दृष्टीनें जोर लावायला हवा.

या शांति-सेनेची मुख्य शक्ति कोणती ? जनतेची संमति हें या सेनेचें मुख्य बळ होय. संपत्तिदान अनेकांनीं दिलें आहे. याचा अर्थ इतका च कीं त्या त्या लोकांची संमति आमच्या कामाला मिळाली. परंतु आपल्याला प्रत्येकाकडून संमति मिळवली पाहिजे. सरकारी कामासाठीं आणि सैन्यासाठीं जो कर वसूल करण्यांत येतो तो अगदीं बालापासून तों वृद्धापर्यंत वसूल करण्यांत येतो. प्रत्येकजण कापड वापरतो. त्या कापडावर कर आहे. चालला पैसा सरकारकडे. आपण पोस्टाचीं कार्डें वापरतों, रेल्वेनें प्रवास करतों, या सगळ्यांतून सरकारला पैसा मिळत असतो. अशा रीतीनें सरकारला प्रत्येक माणसाची संमति मिळत असते.

शांतिसेना प्रभावी व्हायची असेल तर जनतेंतील प्रत्येक व्यक्तीकडून अशी संमति तिला मिळाली पाहिजे. प्रत्येक घरांतून 'संमतिदान' मिळावें अशी माझी इच्छा आहे. शांति-सेनेचें प्रत्यक्ष कार्य संपत्तिदानाच्या आधारें चालेल. परंतु शांति-सेनेचें खरें बळ 'संमतिदानांत' आहे. यासाठीं मीं अशी सूचना केली आहे कीं दर महिन्याकाठीं पांच माणसांच्या एका कुटुंबांतून स्वतः कांतलेल्या सुताची एक गुंडी मिळावी. या गुंडीची किंमत वीस नये पैसे असेल. म्हणजे प्रत्येक व्यक्तीकडून चार नये पैसे दर महिन्यास मिळतील. हें मीं पैशाच्या भाषेंत मांडलें तरी मला पैसे नकोत, श्रम हवा आहे. असा श्रम प्रत्येक कुटुंबांतून मिळूं लागला तर एक फार मोठी क्रांति होईल. प्रत्येक घरांत उत्पादन वाढेल. एखादा म्हातारा किंवा आजारी मनुष्य देखील एक गुंडी महिन्याची देऊं

शकेल. या एका गुंडीनें शांति-सेनेला आर्थिक मदत फारशी मिळेल असें नाहीं. आर्थिक मदत तर संपत्ति-दानानें च मिळेल, परंतु नैतिक बळ या 'संमति-दाना' नें मिळेल.

■ ■ ■

## शांति-सेनेबाबत प्रश्नोत्तरें : २६ :

**प्रश्न**--लोक-सेवक आणि शांति-सैनिक यांमधें काय फरक आहे ?

**वि.**--सत्याग्रही लोक-सेवकांची कल्पना मर्यादित होती. असे सेवक फार मिळतील अशी मीं कल्पना केली नव्हती. कांहीं निःपक्ष, निष्काम सेवक लाभले तर ते जिल्हा-निवेदक व्हावेत अशी माझी कल्पना होती.

परंतु आतां ही शांति-सेनेची कल्पना विशाल आहे. जितक्या म्हणून वयांत आलेल्या व्यक्ति असतील त्या सर्व शांति-सैनिक बनूं शकतात. यांत हि पुनः सेवा-सेना आणि शांति-सेना असा भेद आहे. शांति-सेनमधें सेवा-सेनेंतील च लोक असतील हें खरें असलें तरी शांति-सैनिकांना सर्वोदय मंडळाचे नैतिक आदेश मानावे लागतील. शांति-सैनिक एखाद्या विशिष्ट क्षेत्रांत काम करीत असतांना सर्वोदय मंडळानें जर त्याला अन्यत्र जाण्यास सांगितलें तर त्यानें जायची तयारी ठेवली पाहिजे. सेवा-सेनेच्या सैनिकावर मात्र असें बंधन राहणार नाहीं. परंतु शांति-सैनिकांवर तसें बंधन राहील.

ही शांति-सेनेची योजना जर यशस्वी झाली तर तितक्या क्षेत्रापुरता सरकारचा संरक्षणाचा खर्च वाचेल. तो खर्च त्या

क्षेत्राच्या अन्य कामासाठीं सरकारनें द्यावा असें आपण सरकारला सांगूं. तेवढ्या क्षेत्रांत सरकारला पोलिस आणि मिलिटरी ठेवावी लागत नाहीं, असें झालें पाहिजे तर च खऱ्या अर्थानें तें क्षेत्र ग्राम-राज्य झालें असें म्हणतां येईल.

**प्रश्न**—शांति-सेनेच्या सैनिकांचा स्वतंत्र गणवेश असावा काय ?

**वि.**—सामान्यपणें विशेष गणवेष असूं नये हें चांगलें. वेगळ्या गणवेषामुळें सर्वसाधारण जनतेहून ते अलग पडतील. त्यानें जनतेवर या लोकांची प्रतिक्रिया प्रतिकूल होईल. आपले सैनिक समाजापासून वेगळे पडतां कामा नयेत, ही मुख्य खबरदारी घेतली पाहिजे.

शिस्त म्हणून ड्रील इत्यादि सैनिकांकडून जरूर करवून घ्यावी. आग लागल्यावर लोकांची नुसती गर्दी झाली तर आग विझविण्याचें काम बिकट होतें. म्हणून शिस्तीची आणि पद्धतशीर कामाची संवय आपल्या सैनिकांना अवश्यक आहे. त्यांना चांगलीं चांगलीं भजनें हि म्हणतां आलीं पाहिजेत. उत्तेजित जमावामध्यें जाऊन शांतिपूर्वक भजन गाण्यानें वातावरण निवळायला जरूर मदत होईल.

■ ■ ■

## सर्वोदय-मंडळें : २७ :

(सबंध केरळ प्रांतासाठीं म्हणून एक आठ व्यक्तींचें सर्वोदय-मंडळ विनोबांच्या प्रेरणेनें बनविण्यांत आलें. या सर्वोदय मंडळाचें कार्य आणि व्याप्ति या बाबत विनोबांनीं पुढीलप्रमाणें स्पष्टीकरण केलें.)

"आम्हीं सर्व भूदानसमित्यांचें विसर्जन केलें असतां आतां हें 'सर्वोदय-मंडळ' कां स्थापन केलें असें कित्येकांना वाटेल. परंतु तंत्र म्हणून समिति न नेमली तर कांहीं व्यवहार चालविण्यासाठीं योजना करावी च लागते. त्यासाठीं श्रद्धास्थान असावें लागतें. परंतु या मंडळांत आणि समित्यांत एक भेद आहे. लोकतंत्र पद्धतींत निवडणुकीनें समिति निवडण्यांत येते तसा हा प्रकार नाहीं. निवडणुकांत गटबाजी आणि पक्षोपपक्ष निर्माण होतात. येथें कोणाची निवडणूक वगैरे करण्याचा प्रश्न नाहीं. हें सर्वोदयाचें कार्य आहे. विनोबाला भूदानासाठीं का कुणीं निवडून दिलें होतें ? एका माणसाच्या मनांत विचार आला, त्यानें काम सुरूं केलें, लोकांना तें पसंत पडलें आणि मंडळींनीं ठिकठिकाणीं कामाला सुरवात केली. म्हणून विनोबा देखील कोणाला निवडून देत बसणार नाहीं. त्याला अधिकार तरी कुणीं दिला आहे ? मग आम्ही हें जें मंडळ स्थापन करतों तें काय आहे ? तें एक मित्र-मंडळ आहे. आमचें व्यापक मित्र-मंडळ भारतभर आहे च. परंतु विशिष्ट क्षेत्रांत कामाची योजना आखणारें हें छोटें मंडळ राहील.

हें मंडळ कामाची योजना करील आणि सत्याग्रही लोक-सेवक बनवील. हे लोक-सेवक आम्हीं जी पंचविध निष्ठा सांगितली आहे ती मानणारे असतील. हें मंडळ बनवितांना अमुक च माणूस कां घेतला आणि अमुक च कां घेतला नाहीं याचें उत्तर "अशोक-वन-न्याय;" असें थोडक्यांत देतां येईल. 'सीतेला अशोक-वनांत च कां ठेवलें ? आम्र-वनांत ठेवलें नाहीं म्हणून.'

आपल्याला चर्चा करीत बसायचें नसून अर्चा (पूजा) करायची आहे. संपत्तिदान येथें अल्प कां होईना पण मिळालें

आहे. दात्यांची इच्छा असेल तर त्या संपत्तिदानाचा विनियोग कसा करावा याबाबत हें मंडळ सल्ला देऊं शकेल.

या मंडळांत कांहीं वृद्ध लोक आहेत आणि कांहीं तरुण आहेत. तें योग्य आहे. मीं अनेकदां धनुष्य-बाणाची उपमा दिली आहे. तरुण हे बाण आहेत आणि वृद्ध हे धनुष्य आहेत. धनुष्य-बाणांचा संयोग झाल्यानें च कार्य होतें. प्रेरणा आणि आशीर्वाद देण्यासाठीं वृद्ध असावेत आणि प्रत्यक्ष कार्य करण्यासाठीं तरुण असावेत. मला कुणीं सांगितलें कीं दिल्लीच्या लोकसभेंत महाभारतांतलें एक वाक्य लिहून ठेवलें आहे. "**न सा सभा यत्र न संति वृद्धाः**"–जिथें वृद्ध नाहींत ती सभा च नव्हे.

■ ■ ■

## सर्वोदय-मंडळांचें कार्य : २८ :

आपापल्या प्रांतांत विशाल सेवा-सेना आणि शांति-सेना उभी करणें हें सर्वोदय मंडळाचें मुख्य काम आहे. प्रत्येक शांति-सैनिकाला वेतन असलें च पाहिजे असें नाहीं. घरचें खाऊन हि काम करणारे कांहीं सैनिक असतील. परंतु जर वेतन द्यावें लागलें तर तें देण्याची जबाबदारी स. मंडळाची असणार नाहीं. संपत्ति-दात्यांमार्फत सोय करून देण्याची खटपट हें मंडळ करील इतकें च.

ग्रामदानी गांवांत व्यवस्थित काम व्हावें अशी खटपट हें मंडळ करील, परंतु मंडळ स्वतः काम अंगावर घेणार नाहीं. सरकार, स. से. संघ, खादी कमिशन, ग्राम-पंचायत किंवा संबंधित व्यक्ति यांच्याकडून काम करवून घेणें हें मंडळाचें काम राहील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक 28732 वि: नि.
नों. दि. 25/2/67


सर्वोदय-मंडळांतील सर्व निर्णय एकमतानें होतील. कमींत कमी किती सभासद हजर असले पाहिजेत हें सर्वांनीं मिळून ठरवावें. परंतु महत्त्वाच्या प्रश्नावर हजर असलेल्या आणि नसलेल्या हि प्रत्येक सभासदाचें जरूर तर पत्रद्वारा मत मागविण्यांत यावें. कोणता हि सभासद आपलें भिन्न मत प्रकट करूं शकेल. परंतु विशेष नैतिक मुद्दा नसेल तर त्यानें विरोध करूं नये. सैद्धांतिक प्रश्नाबाबत त्यानें जरूर नकाराधिकार (व्हेटो) वापरावा. इतरांनीं समजावल्यानंतर हि जर एखाद्या सभासदाचा विरोध कायम असेल तर तो प्रश्न सोडून देण्यांत यावा. मी म्हणतों तसल्या सर्वोदय-मंडळाची कल्पना ठिकठिकाणीं अंमलांत आली तर एक प्रचंड नैतिक शक्ति देशांत निर्माण झालेली दिसेल. हें एक समुद्र-कार्य आहे. गांधीनिधि त्या समुद्रांतील एक बिंदु ठरेल. कारण सर्वोदय-मंडळाला प्रत्येक घराचा पाठिंबा असणार आणि प्रत्येक घरांतून संपत्तिदान त्याला मिळणार. हें काम सुरवातीला सबंध प्रांतभर सुरूं न झालें तरी हरकत नाहीं. प्रांतांतील कांहीं भागांतून कामाची सुरवात होऊं शकते. हळू हळू क्षेत्र वाढत जाईल. आपल्याला शिवाजीसारखें काम करायचें आहे. त्यानें स्वराज्याची स्थापना केली ती साऱ्या भारतांत किंवा सबंध महाराष्ट्रांत थोडी च केली? जितका भाग त्याच्या ताब्यांत होता त्यामधें त्यानें स्वराज्याची स्थापना केली आणि नंतर जो जो प्रदेश त्यानें जिंकला तो तो आपल्या स्वराज्याला तो जोडत गेला. त्याप्रमाणें एकदम सबंध केरळ आपल्याला व्यापतां न आला तरी चालेल. सुरवातीला कोझीकोड किंवा पालघाट सारख्या क्षेत्रांत काम सुरूं होईल. तेवढ्या क्षेत्राची शांति-सेना स्थापन होईल. परंतु आपल्या कचेरींत सबंध केरळचा नकाशा टांगलेला असेल

आणि आपलें स्वराज्य दिवसेंदिवस व्यापक कसें होत जाईल याचा आपण प्रयत्न करीत राहूं.

अल्प शक्तीनें व्यापक क्षेत्रांत काम करूं पाहणें याला म्हणतात केंद्रीकरण. आणि जितकी शक्ति असेल तेवढ्या च क्षेत्रांत काम करणें याला म्हणतात विकेंद्रीकरण. प्रचार जरूर व्यापक क्षेत्रांत करूं शकतां. परंतु प्रत्यक्ष कार्य शक्तीप्रमाणें सीमित क्षेत्रांत च केलें पाहिजे.

■ ■ ■

## ग्रामराज्यांत सरकारचें स्थान : २९ :

आज जगामधें प्रत्येक देशाचें वेगवेगळें सरकार आहे. साऱ्या जगाचें एक राज्य नाहीं. परंतु पुढें जेव्हां सगळ्या जगाचें मिळून एक राज्य बनेल, त्यावेळीं प्रत्येक देश आपापला अंतर्गत कारभार पाहील आणि आंतर्देशीय बाबींबाबत हें जागतिक सरकार विचार करील. या जागतिक सरकारचें काम इतकें च कीं प्रत्येक देशाच्या सरकारला सल्ला देणें आणि जरूर तिथें मदत करणें. दोन देशांच्या बाबतींत एखादा प्रश्न उत्पन्न झाला तर हें जागतिक सरकार निर्णय देईल.

याप्रमाणें च प्रत्येक गांवांत आपापला कारभार पाहण्यासाठीं गांवोगांवचें एक सरकार असेल. सरकार या गांवच्या सरकारला सल्ला देईल; किंवा जरूर तर मदत हि करील. दोन गांवांमधें एखादा प्रश्न निर्माण झाला तर हें सरकार त्याचा निर्णय देईल. थोडक्यांत सांगायचें म्हणजे गांवागांवांचीं सरकारें हीं सुगंधीत फुलें बनतील आणि प्रादेशिक सरकार हें धाग्या-

प्रमाणें, सूत्राप्रमाणें राहील. धाग्याला स्वतःचा सुगंध नसतो. सुगंध फुलाला च असायचा. उलट त्या फुलाचा च सुगंध त्या धाग्याला थोडाबहुत लागायचा. परंतु या फुलांना एकत्र ओंवण्याचें काम धागा करतो. त्याप्रमाणें प्रत्येक गांव हें फूल असेल आणि प्रादेशिक सरकार हा धागा असेल.

आज उलट स्थिति आहे. गांववाल्यांना वाटतें आमच्यापाशीं कांहीं च सत्ता नाहीं, कांहीं च सुगंध नाहीं. जी काय सत्ता किंवा जो कांहीं सुगंध आहे, तो सरकारच्याजवळ आहे. आम्ही गांवचे लोक दीन, हीन, दरिद्री, दुर्बल आहोंत. किती विचित्र दशा आहे ही! दूध, तूप, भाज्या, फळें, धान्य इत्यादि सर्व उत्पन्न करण्याची क्षमता गांवकऱ्यांची असून ते मात्र मानतात कीं आमच्यापाशीं कांहीं नाहीं!! त्याचें कारण एक च. गांवांत ऐक्य नाहीं. एकमेक एकमेकाची चिंता करीत नाहीं. सामूहिक भावना नाहीं. जो तो आपला च विचार करतो. मालक कमी दाम देऊन जास्त काम काढूं पाहतो, तर मजूर कमी काम करून जास्त दाम घेऊं पाहतो, अशी दोघांच्या हितांत रस्सीखेंच चालू आहे. गाडीचे दोन बैल असावेत, एक बैल दुसऱ्या बैलावर भार टाकूं पाहतो आणि दुसरा त्याच्यावर भार टाकूं पाहतो. अशा ओढाताणींत गाडी मात्र पुढें जात नाहीं. तसें आज गांवांचें चाललें आहे. मालक आणि मजूर यांच्या ओढाताणींत गांवाचें आणि देशाचें उत्पन्न मात्र वाढत नाहीं. आज गांवांत तेली उरला नाहीं, कीं विणकर उरला नाहीं. हें असें कां झालें? तेल्याचें तेल महाग पडतें म्हणून विणकर तें तेल घेत नाहीं. आणि विणकराचें कापड

महाग पडतें म्हणून तेली तें घेत नाहीं. मिळून दोघांचे हि उद्योग बंद झाले.

ग्रामदान झाल्यावर आपल्याला सारे ग्रामोद्योग उभे करावे लागतील. गांव स्वावलंबी झाला कीं पैशाची जरूर गांवाला कमींत कमी राहील, गांवांतलें शिक्षण गांवांत होईल. गांवांतलीं भांडणें गांवांत मिटतील, त्यामुळें शहरांचें किंवा सरकारचें नियंत्रण आपोआप च कमी होईल. आज एकानें प्रश्न विचारला कीं; "ग्रामदानी गांवांचा सरकारशीं काय संबंध राहील?" मीं म्हटलें, "एक होता बाप. तो विचारूं लागला कीं, "माझा बापाशीं संबंध काय?" तशासारखा च हा प्रश्न झाला. "अरे, तूं देखील बाप च आहेस ना?" ग्रामदानांत गांव होईल बाप आणि सरकार होईल मुलगा. बापामार्फत ज्याप्रमाणें मुलाला बळ लाभतें त्याप्रमाणें ग्रामदानी गांवांमार्फत सरकारला बळ लाभणार आहे. प्रत्येक गांव बलशाली बनलें कीं त्या देशाचें सरकार हि आपोआप बलशाली बनतें, म्हणून मी म्हणत असतों कीं शक्तीचें अधिष्ठान सरकार नसून गांवें आहेत. परंतु ग्रामदानी गांवें च तशीं अधिष्ठानें बनूं शकतील.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत,
अनुक्रम 28735 विः
क्रमांक नों दिः
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. 99508

## परिशिष्टें :—

### १ पंचविध निष्ठेचीं कलमें

(१) सत्य, अहिंसा आणि अपरिग्रह यांवर माझी पूर्ण निष्ठा आहे. आणि त्या अनुसार जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न मी करीन.

(२) लोकनीतीच्या स्थापनेनें च जगांत खरेंखुरें स्वातंत्र्य नांदूं शकेल, असा माझा विश्वास आहे. म्हणून सर्व तऱ्हेच्या पक्ष-निष्ठ राजकारणापासून व सत्ता प्राप्त करण्यासाठीं चालणाऱ्या लटपटीपासून मी अलिप्त राहीन.

(३) कामनारहित बनून समर्पण भावनेनें मी लोकसेवा करीत राहीन.

(४) माझा अधिकांत अधिक वेळ व संपूर्ण चिंतन सर्वोदयाच्या—अर्थात भूदानमूलक, ग्रामोद्योगप्रधान, अहिंसक क्रांतीच्या कार्यांत मी खर्च करीन.

(५) मी कोणत्या हि प्रकारचा जातिभेद, पंथभेद किंवा वर्गभेद मानणार नाहीं.

## २ ग्रामदानाचा अद्यावत आंकडा

### ३१ ऑगस्ट '५७ पर्यंत

| राज्य | ग्रामदान-संख्या |
|---|---|
| आसाम | ७७ |
| आंध्र | ७५ |
| उत्कल | १८४७ |
| उत्तरप्रदेश | १२ |
| काश्मीर | ० |
| केरळ | ३०१ |
| पंजाब-हिमाचलप्रदेश | ० |
| पश्चिम-बंगाल | ८ |
| बिहार | ९७ |
| मुंबई | २३७ |
| मद्रास | २२३ |
| मध्यप्रदेश | २६ |
| म्हैसूर | १५ |
| राजस्थान | १४ |
| ग्रामदानी गांवांची एकूण बेरीज | २९३२ |

३ ग्रामदानाचा फॉर्म--

# ग्रामदान-पत्र

गांवाचें नांव-- मौजा नं--

तालुका-- जिल्हा--


प्रदेश--

पू. विनोबांच्या सांगण्याप्रमाणें सारी जमीन, बुद्धि, व श्रम देवाचे--गांवाचे--आहेत, ही गोष्ट मला पटली आहे. आणि त्याप्रमाणें माझ्याकडे असलेल्या खालीं लिहिलेल्या तपशिलाच्या जमिनीचा हक्क मी साऱ्या गांव-समाजाकडे या माझ्या लेखानें अर्पण करीत आहें. तसें च माझी सर्व बुद्धि व श्रम-शक्ति देखील गांव-समाजाला अर्पण करीत आहें. गांव-समाज जी व जेवढी जमीन कसण्याकरितां व उपभोगासाठीं मला देईल ती मी खुशीनें माझी सर्व शक्ति खर्च करून कसेन व गांवच्या उत्पन्नांत भर टाकीन. माझ्या या विश्वासाला देव साक्षी आहे. तारीख :

गांवाचें कुल क्षेत्र: कुटुंब संख्या: लोक संख्या:

नांव--(संपूर्ण) स. नं. क्षेत्र : आकार : हक्काचा प्र

सह्या :



REFBK-0011504